cmyk

## संपादकीय

### विसंगत आणि विरोधाभासी न्याय !

२०१७ मधील उन्नाव बलात्कार प्रकरणात न्यायालयाने आरोपी माजी आमदाराला केवळ जामीन मंजूर केला नाही, तर त्याची शिक्षाही निलंबित केली. कुलदीप सेंगर हे त्याचे नाव आहे. या धक्कादायक निर्णयाच्या निषेधार्थ न्यायालयाबाहेर निदर्शने करण्यात आली.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२४१ | सोमवार दि.२९ डिसेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### चेक बाऊन्स फौजदारी गुन्हा ठरत नाही–हायकोर्ट

दिल्ली: कायदेशीर कारवाई म्हणून बँक खाते गोठवले गेले असेल, तर अशा प्रकरणांमध्ये चेक (धनादेश) बाऊन्सच्या आधारावर फौजदारी खटला चालवला जाऊ शकत नाही, असा पुनरुच्चार चेक बाऊन्सशी संबंधित तीन फौजदारी खटले रद्द करताना दिल्ली उच्च न्यायालयाने केला. न्यायमूर्ती नीना बन्सल कृष्णा यांच्या एकल पीठाने सुमेरु प्रोसेसर्स प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक फरहाद सूरी आणि धीरन नवलखा यांनी दाखल केलेल्या याचिका मान्य केल्या. २०२० मध्ये एका कंपनीने घेतलेले कर्ज आणि भाड्याचे पैसे परत करण्यासाठी काही चेक दिले होते. हे चेक २४ लाख ते १ कोटी १० लाख रुपयांपर्यंतचे होते. मात्र, जेव्हा हे चेक बँकेत टाकले गेले, तेव्हा कंपनीचे बँक खाते गोठवलेले असल्यामुळे ते बाऊन्स झाले. त्यानंतर कंपनीच्या संचालकांवर गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र न्यायालयाने आता असा निर्णय दिला आहे.

### गांधी, नेहरूचा हिंदूस्तान लिंचिस्तान बनत चाललाय

श्रीनगरः बांग्लादेशातील हिंदू समुदायांवर स्थानिकांकडून हल्ले करण्यात येत असल्याच्या पार्श्वभूमीवर एका हिंदू तरूणाची हत्या झाल्यानंतर जम्मू आणि काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री तथा पीडीपीच्या अध्यक्षा मेहबूबा मुफ्ती यांनी महात्मा गांधी आणि जवाहरलाल नेहरू यांचा हिंदूस्तान अर्थात भारत आता ''लिंचिस्तान'' (लिंचिंगची भूमी) बनत चालला असल्याचे मत व्यक्त करत केंद्र सरकार आणि भाजपावर टीका केली. मेहबूबा मुफ्ती पुढे बोलताना म्हणाल्या की, बांग्लादेशात आपल्या काही हिंदू बांधवांची हत्या झाली आणि देशभरात एकच गोंधळ उडाला. पण जेव्हा आपल्याच देशात लिंचिंग होते, तेव्हा कोणीही आवाज उठवत नसल्याचेही यावेळी त्या म्हणाल्या. शिवाय देशाच्या धर्मनिरपेक्ष रचनेचा नाश होत असल्याबाबतही त्यांनी चिंता व्यक्त केली.

### पॅराग्लायडिंग पायलटचा मृत्यू, महिला पर्यटक बचावली

धर्मशालाः प्रसिद्ध साहसी क्रीडा स्थळ अशी ओळख असलेल्या हिमाचल प्रदेशमधील बीर बिलिंग येथे पॅराग्लायडिंग अपघातात एका वैमानिकाचा मृत्यू झाला. या अपघातात त्यांच्यासोबत असलेली महिला पर्यटक थोडक्यात बचावली. विशेष म्हणजे, या वर्षातील हा तिसरा जीवघेणा अपघात असून, यामुळे या भागातील सुरक्षा मानकांवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. उड्डाण केल्यानंतर काही वेळातच पॅराग्लायडर कोसळले. या अपघातात मोहन सिंग (रा. बरोट) या वैमानिकाचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्यासोबत उड्डाण करणारी महिला पर्यटक सुरक्षित असल्याची माहिती त्यांचे सहकारी प्रताप सिंग यांनी दिली.

### शरद पवार माझे मार्गदर्शक–गौतम अदानी

बारामतीः गौतम अदानी यांनी शरद पवार यांच्यावर स्तुतीसुमने उधळत ते माझे मार्गदर्शक असल्याचा उल्लेख केला आहे. उद्योगपती गौतम अदानी पुन्हा एकदा बारामतीच्या दौऱ्यावर आले असून, यावेळी ज्येष्ठ नेते शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुप्रिया सुळे, सुनेत्रा पवार स्वागतासाठी एकत्र होते. शरद पवार यांच्या नावाने उभारण्यात आलेल्या एआय सेंटरचे अदानी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. शरद पवार माझ्यासाठी आदरणीय आणि आदर्श आहेत. दीर्घकालीन राजकारणामध्ये शरद पवार यांनी खूप मोठे सामाजिक काम उभारले आहे, असे म्हणत गौतम अदानींनी शरद पवारांचे कौतुक केले. त्यांचे हे विधान राज्यभरात चर्चेचा विषय बनले आहे.

### भाजपात महिलांना दुय्यम स्थान–सपकाळ

मुंबई : देशात आज जात, धर्म, भाषा व पंथ यावरून समाजासमाजात विभाजन केले जात आहे. सामाजिक सलोखा बिघडवण्याचे काम सत्ताधारी भाजपा सरकार करत आहे. देशासमोर आज मोठे संकट उभे ठाकले असून या परिस्थितीत देशाला तारणारा एकच विचार असून तो काँग्रेसचा विचार, त्याची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या स्थापना दिनानिमित्त पक्ष कार्यालय टिळक भवन येथे झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सेवादलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन ॲड. गणेश पाटील, राजन भोसले, सरचिटणीस संदेश कोंडविलकर, श्रीरंग बरगे, जोजो थॉमस यांच्यासह सेवादल व काँग्रेसचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.

# मराठवाड्यात २३ लाख ४२ हजार हेक्टरवर रब्बी पेरा

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

**मराठवाड्यात मॉन्सूनसह मॉसूनोत्तर पावसामुळे रब्बीची पेरणी विलंबाने झाली. ही रब्बी पेरणी सर्वसाधारण क्षेत्राच्या पुढे झाली आहे. सर्वसाधारण २२ लाख ३६ हजार ७८१ हेक्टर क्षेत्राच्या तुलनेत प्रत्यक्षात सुमारे २३ लाख ४२ हजार ६८.३० हेक्टरवर रब्बीची पेरणी झाली आहे.**

यंदाच्या रब्बी हंगामात छत्रपती संभाजीनगर, जालना व बीड या तीन जिल्ह्यांतील सर्वसाधारण ७ लाख २७ हजार ५७४. ८२ हेक्टर आणि लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी, हिंगोली या पाच जिल्ह्यांतील १५ लाख ९ हजार २०७ हेक्टर मिळून २२ लाख ३६ हजार ७८१.८२ हेक्टर रब्बीचे सर्वसाधारण क्षेत्र आहे. त्या तुलनेत



प्रत्यक्षात छत्रपती संभाजीनगर, जालना व बीड या तीन जिल्ह्यात ७ लाख ५९ हजार ४२३.४० हेक्टर म्हणजे सर्वसाधारण क्षेत्राच्या तुलनेत सुमारे १०४.३८ टक्के तर लातूर धाराशिव, परभणी, हिंगोली, नांदेड या पाच जिल्ह्यांत सुमारे १५ लाख ८८ हजार ६४४.९० हेक्टर म्हणजे सर्वसाधारण क्षेत्राच्या तुलनेत १०४.८७ टक्के क्षेत्रावर रब्बीची पेरणी झाली आहे. खरिपात शेती पिकाचे नुकसान झाल्याने त्याची कसर रब्बीत भरून काढण्यासाठी रब्बीचे क्षेत्र वाढ कशी करता येईल याविषयी कृषी विभागाचे अधिकारी आणि वसंतराव नाईक कृषी विद्यापीठाच्या तज्ञांमध्ये चिंतन झाले होते. त्यावेळी त्याची आवश्यकता लक्षात ▶▶ पान २ वर

# मुंबई मनपासाठी काँग्रेसने वंचितला ६२ जागा सोडल्या!

## काँग्रेस सोबत युती जाहीर ; २५ वर्षानंतर आले एकत्र

मुंबई । प्रतिनिधी

**मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांपासून ॲड.प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडी आणि काँग्रेस यांच्यात मुंबईतील जागा वाटपाबाबत चर्चा सुरु होत्या. अखेर वंचित आणि काँग्रेसने एकत्रित पत्रकार परिषद घेत आघाडीची घोषणा केली आहे. मुंबईत वंचित बहुजन आघाडी ६२ जागांवर मैदानात उतरणार आहे. याचा अर्थ वंचितला मुंबई महानगरपालिकेत मोठा वाटा काँग्रेसकडून देण्यात आला आहे. विशेष म्हणजे अनेक वर्षानंतर काँग्रेस आणि प्रकाश आंबेडकर मुंबई महानगरपालिकेसाठी एकत्र आल्याचे दिसत आहे.**



काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, भारिप सोबत आमची आघाडी होती. १९९९ नंतर राजकीयदृष्ट्या आम्ही एकत्र नव्हतो. २५ वर्षानंतर आघाडीच्या घोषणेचा मला आनंद आहे. काँग्रेस आणि वंचित हे नैसर्गिक मित्र आहेत. काँग्रेस आणि वंचितमध्ये चांगलं नातं आहे, असे म्हणत त्यांनी मुंबईत वंचित आणि काँग्रेसच्या आघाडीची घोषणा केली. आमची आघाडी विचाराची आहे. सत्तेसाठी आमची आघाडी नाही. जागांपेक्षा विचारांना आम्ही प्राधान्य देत आहोत. हा संख्येचा खेळ आणि तर हा विचारांचा मेळ आहे. आमची आघाडी विचारांची आहे, सत्तेसाठी नाही. आजपासून आम्ही दोन मित्रपक्ष आहोत. मुंबई महापालिकेत वंचित आणि काँग्रेस एकत्र लढणार, असे देखील ते म्हणाले. वंचितचे प्रदेश उपाध्यक्ष धैर्यवर्धन पुंडकर म्हणाले की, भाजपला रोखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. प्रकाश आंबेडकरांनी ऑनलाइन बैठकीत युतीला मान्यता दिली आहे. २२७ पैकी ६२ जागांवर आम्ही निवडणूक लढवणार आहोत, अशी माहिती त्यांनी पत्रकार परिषदेत दिली. दरम्यान, काँग्रेस मुंबईत किती जागा लढणार? याबाबतचा आकडा काँग्रेसने गुलदस्त्यात ठेवला आहे. काँग्रेस आणि शरद पवार गटात जागा ▶▶ पान २ वर



# कार्यक्रम बारामतीचा पाहुणे आदाणी चर्चा मात्र पवारांची

पुणे । प्रतिनिधी

उद्योगपती गौतम अदानी हे आज बारामती मध्ये पवार यांनी निमंत्रित केलेल्या कार्यक्रमासाठी उपस्थित होते हा कार्यक्रम कसा झाला यापेक्षा तो कशासाठी होता हे पाहता पवार कुटुंबी राजकारणात वेगळे असले तरी या व्यासपीठावर मात्र एकत्र दिसून आले राजकारणातील खासदार शरद पवार खासदार सुप्रिया सुळे उपमुख्यमंत्री अजित पवार आमदार रोहित पवार आणि पवार कुटुंबातील इतर सदस्य उपस्थित होते या कार्यक्रमात शरद पवार आणि अजित पवार हे काका पुतणे पक्षीय राजकारणात वेगळे असले तरी जवळजवळ नात्याने आहेतच ते आज पुन्हा दिसून आले अदानी भाषण करत होते मात्र पवार काका पुतणे गप्पात रंगले होते या गप्पा कौटुंबिक नसतील हे निश्चितच पण भविष्यातील राजकारणावर नक्कीच गप्पा मारत असावेत.

# सौर पंप तक्रारींसाठी महावितरणचे 'पोर्टल' सज्ज

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील शेतकऱ्यांना 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजनेचा लाभ घेताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी आणि तक्रारी सोडवण्यासाठी महावितरणने आता 'ऑनलाइन तक्रार निवारण पोर्टल' कार्यान्वित केले आहे. या सुविधेमुळे शेतकऱ्यांना आता सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवण्याची गरज उरली नसून, केवळ एका क्लिकवर आपल्या तक्रारींची नोंद आणि मागोवा (ट्रॅकिंग) घेता येणार आहे. सौर कृषी पंप बसवताना होणारा विलंब किंवा ▶▶ पान २ वर

# मुंबईत शरद पवारांची ठाकरे बंधूंना साथ

## दहा जागांवरच मानले समाधान

मुंबई । प्रतिनिधी

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. महापालिका निवडणुकीसाठी ठाकरे बंधुंची युती झाल्यानंतर त्यांच्यासोबत महाविकास आघाडीचे पक्ष जाणार का? असा सवाल उपस्थित केला जात होता. अशातच अखेर मुंबई महापालिका निवडणूकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षाने ठाकरे बंधुबरोबर युती केली आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाला उबाठा - मनसे यूतीकडून १० जागा देण्यात आल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा ५२ जागांच्या मागणीचा प्रवास अखेर १० जागांवर येऊन संपला आहे. त्यामुळे आता मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत ठाकरे बंधूबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस ▶▶ पान २ वर

## श्री संत वामनभाऊ महाराज सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी निमित्त

# दर्शनासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी येण्याची शक्यता

बीड । प्रतिनिधी

**संतश्रेष्ठ संत वामनभाऊ महाराज यांचा पन्नासावा सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी सोहळा नवीन वर्षात तीन जानेवारीपासून सुरू होत आहे. या पुण्यतिथी सोहळ्यास राज्याचे मुख्यमंत्री आणि काही मंत्री गण उपस्थित राहणार आहेत. सोबतच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी देखील संत वामनभाऊ महाराज यांच्या गहिनीनाथ गडावर येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. हा सोहळा तीन जानेवारी ते १० जानेवारी २६ पर्यंत चालणार आहे.**



बीड जिल्ह्यातील चिखली लगत असलेल्या गहिनीनाथ गडावर संतश्रेष्ठ वामनभाऊ महाराज यांच्या पन्नासावा सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी सोहळा होत आहे. हा सोहळा तीन जानेवारी २०२६ रोजी सुरू होत असून, सांगता शनिवार दिनांक १० जानेवारी २०२६ रोजी आहे. या सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी सोहळ्यातील सप्ताहाच्या कालखंडामध्ये देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहणार असल्याचे खात्रीलाय वृत्त आहे. विशेषता या संदर्भात मुख्यमंत्री कार्यालयाकडून पंतप्रधान कार्यालयाकडे निमंत्रण गेले असल्याचे समजते. गहिनीनाथ गडाचे मठाधिपती महंत विठ्ठल महाराज यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना गहिनीनाथ ▶▶ पान २ वर

# राष्ट्रवादी पक्ष फोडण्यामागे अदानींच्या भावाचा सहभाग

## संजय राऊतांच्या दाव्याने खळबळ

मुंबई । प्रतिनिधी

**शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फोडण्यात गौतम अदानी यांच्या भावाचा सहभाग होता, असा दावा ठाकरेसेनेचे नेते, खासदार संजय राऊत यांनी केला आहे. तसेच, रोहित पवार यांनी अदानींच्या गाडीचे सारथ्य का केले, हे त्यांनाच विचारा, असा टोला देखील त्यांनी लगाविला.**



राऊत म्हणाले, शरद पवार आणि गौतम अदानी यांचे संबंध राजकीय नसून कौटुंबिक आणि व्यक्तिगत आहेत. आपल्या कार्यक्रमाला कुणाला बोलवायचे हा त्यांचा प्रश्न आहे. त्यांनी गौतम अदानींना बोलावले असेल आणि त्यासाठी पवारांचे संपूर्ण कुटुंब, ज्यांनी पक्ष फोडला ते अजित पवार सुद्धा उपस्थित असतील तर तो त्यांचा व्यक्तिगत प्रश्न आहे. मुंबईवर मोदींचा आणि भाजपचा मित्र ज्या पद्धतीने ताबा मिळवत आहे, त्याला आमचा नैतिक विरोध आहे. भाजपच्या मदतीने गौतम अदानी मुंबई गिळण्याचा प्रयत्न करत आहेत. टाटा, बिर्ला, अंबानी यांच्यासह अनेक उद्योगपती मुंबईत आलेत. पण, ज्या पद्धतीने ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२६ डिसेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४४.०० क्विंटल | २,२९१ | ३,०९२ | २,५२८ |
| ज्वारी/हायब्रिड: ७८.५० क्विंटल | १,६५० | ३,९४१ | ३,१७४ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ३.०० क्विंटल | ६,२०१ | ६,७५१ | ६,४७६ |
| उडीद : १५.०० क्विंटल | ५,६१० | ६,०७० | ५,८७० |
| बाजरी: १३.०० क्विंटल | २,२०१ | ३,१६५ | २,८०३ |
| मुग: ०.५० क्विंटल | ६,३०१ | ६,३०१ | ६,३०१ |
| सोयाबीन: ६१६.०० क्विंटल | ४,००० | ४,७२५ | ४,६३३ |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |

# तुळजापुरात शाकंभरी नवरात्र महोत्सव उत्साहात प्रारंभ

## सात दिवस चालणाऱ्या महोत्सवाची सांगता ३ जानेवारी रोजीला

धाराशिव । प्रतिनिधी

**श्री तुळजाभवानी देवींच्या शाकंभरी नवरात्र महोत्सवास रविवारी घटस्थापनेने भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. दुपारी १२ वाजता मुख्य यजमान उल्हास अनंतराव कागदे यांच्या हस्ते मंदिरातील गणेश विहारात सपत्नीक विधीवत घटस्थापना करण्यात आली आणि सात दिवस चालणाऱ्या या शाकंभरी नवरात्र महोत्सवास सुरुवात झाली.**



या प्रसंगी तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने, महंत तुकोजी बुवा, महंत चिलोजी बुवा, महंत वाकोजी बुवा, उपाध्ये सुनीत (बंडू) पाठक, पुजारी मंडळाचे अध्यक्ष विपिन शिंदे, अमरराजे कदम, अनंत कोंडो, लेखाधिकारी संतोष भेंकी, सहायक धार्मिक व्यवस्थापक अनुप ढमाले, रामेश्वर वाले यांच्यासह मंदिर संस्थानचे अधिकारी, कर्मचारी, पुजारी बांधव व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंत्रोच्चार, विधी आणि भक्तीभावाने संपूर्ण परिसर मंगलमय झाला होता. श्री तुळजाभवानी ▶▶ पान २ वर

### नवरात्र महोत्सवात अशा होणाऱ्या विधी

या नवरात्र काळात श्री तुळजाभवानी देवींची २९ डिसेंबर रोजी रथ अलंकार महापूजा. ३० डिसेंबर रोजी मुरली अलंकार महापूजा. ३१ डिसेंबर रोजी शेषशाही अलंकार महापूजा तसेच, सकाळी ७ वाजता जलयात्रा. १ जानेवारी रोजी भवानी तलवार अलंकार महापूजा. २ जानेवारी रोजी महिषासुरमर्दिनी अलंकार महापूजा संपन्न होणार आहे. तसेच शाकंभरी नवरात्र काळात दररोज रात्री श्री तुळजाभवानी देवींचा छबीना (मिरवणूक) निघणार आहे. संपूर्ण तुळजापूर नगरी भक्ती, श्रद्धा आणि उत्सवाच्या वातावरणाने भारावून गेली आहे.

cmyk

अग्रलेख

# विसंगत आणि विरोधाभासी न्याय !

२०17 मधील उन्नाव बलात्कार प्रकरणात न्यायालयाने आरोपी माजी आमदाराला केवळ जामीन मंजूर केला नाही, तर त्याची शिक्षाही निलंबित केली. कुलदीप सेंगर हे त्याचे नाव आहे. या धक्कादायक निर्णयाच्या निषेधार्थ न्यायालयाबाहेर निदर्शने करण्यात आली. सरकारच्या विरोधात, एखाद्या व्यक्तीच्या विरोधात अथवा एखाद्या संस्थेच्या विरोधात निदर्शने होणे सामान्य बाब आहे. न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात निदर्शने केली जाणे ही धोक्याची घंटा आहे. निदर्शने झाली किंवा करावी लागली त्याचे कारण हा निर्णय अन्याय्य वाटतो आहे. तांत्रिक आधारावर आरोपीची शिक्षा निलंबित केली असली तरीही त्याने केलेला गुन्हा आणि त्याच्याकरवी केली गेलेली कृत्ये त्याला या दिलाशासाठी पात्र निश्चितच ठरवत नसल्यामुळे आक्रोश आहे.

सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करण्यात आली आहे. तेथे नक्की न्याय मिळेल असा केवळ पीडितेलाच नाही तर सगळ्यांनाच विश्वास आहे. पीडिता आणि तिच्या आईने निराशा व्यक्त केली आहे, त्याचवेळी वरच्या न्यायालयात दाद मागण्याचा निर्धारही बोलून दाखवला. उच्च न्यायालयावरचा आमचा विश्वासच उडाला आहे ही त्यांनी व्यक्त केलेली प्रतिक्रिया त्यांची वेदना दर्शवणारीच आहे. उत्तर प्रदेशच्या उन्नावमधील हे बलात्कार प्रकरण आठ वर्षांपूर्वीचे आहे. पीडिता तेव्हा अल्पवयीन होती. आमदार असणाऱ्या सेंगरने तिच्यावर अत्याचार केले. कनिष्ठ न्यायालयाने त्याला गुन्ह्यात दोषी ठरवले होते आणि जन्मठेपेची शिक्षा दिली होती. केवळ जन्मठेपच नाही तर मरेपर्यंत त्याला तुरूंगात ठेवले जावे असा निवाडा कनिष्ठ न्यायालयाने केला होता. ही शिक्षा वरच्या न्यायालयाने निलंबित करणे आणि आरोपीला जामीन मंजूर करण्याचा प्रकार त्यामुळेच एकदम विसंगत किंवा विरोधाभासाचा ठरतो. जर आरोपीला आयुष्यभर तुरूंगात ठेवले जावे असे एका न्यायालयाला वाटत असेल तर त्याचा सरळ अर्थ आहे की त्याने केलेला गुन्हा अतिशय गंभीर आहे. हा आरोपी भविष्यात केवळ त्या पीडितेलाच नव्हे तर संपूर्ण समाजासाठीही धोकादायक ठरू शकतो असा निष्कर्ष न्यायालयाने काढला असणार. त्यामुळेच वरच्या न्यायालयाने आता जो निर्णय दिला आहे तो वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. बलात्काराची घटना जेव्हा घडली होती त्यावेळी सुरुवातीला प्रकरण दाबण्याचाच प्रयत्न झाला होता. त्यानंतरही पीडितेची आणि तिच्या कुटुंबाची जी छळवणूक केली गेली आणि त्याला माध्यमातून तोंड फुटल्यानंतर या प्रकरणात मग पुढील हालचाली केल्या गेल्या. अन्यथा सेंगर तेव्हाच मुक्त होऊन उजळ माथ्याने वावरला असता आणि कदाचित पुन्हा लोकशाहीचे पवित्र मंदिर असलेल्या सभागृहातही दिसला असता. खलप्रवृत्तीची माणसे केवळ चित्रपटात नसतात.

उलट वास्तवात अशी माणसे असल्यामुळेच चित्रपटातही तशा व्यक्तीरेखा दाखवल्या जातात. एखाद्या पीडित कुटुंबावर खलनायकाकडून ज्या प्रकारचे अत्याचार केले जातात ते सगळे अत्याचार या प्रकरणात केले गेले. त्यात पीडितेच्या पित्याला आपले प्राण गमवावे लागले. पीडिता आणि तिच्या वकिलाचीही हत्या करण्याचा प्रयत्न झाला. ते ज्या कारने प्रवास करत होते, त्या कारला एका ट्रकने धडक दिली. सुदैवाने ते दोघे बचावले, मात्र गंभीर जखमी झाले. अपघाताच्या या घटनेत तिच्या दोन नातलगांचा मृत्यू झाला. या बाबीत आरोपी जेरबंद होत नाही तोपर्यंत आणि त्यानंतरही गेल्या काही वर्षांत पीडितेला काय त्रास सहन करावे लागले असतील त्याची दाहकता समजण्यासाठी पुरेशा आहेत. मागचा हा घटनाक्रम पाहता आरोपीला आता मिळालेली सूट चुकीचा संदेश देणारी आहे.

प्रभावशाली व्यक्तींकरता खरेच कायदे वेगळे असतात का आणि प्रत्येक गुन्ह्यात ते सुटका करून घेऊ शकतात एवढ्या पळवाटा त्यांच्यासाठी कायद्यात निर्माण कशा होतात हा प्रश्न केवळ त्या पीडितेलाच नाही तर कोणालाही पडू शकतो. केवळ तिचे कुटुंबच नाही तर देशातील प्रत्येक महिलेचे मनोबल यामुळे खच्ची होऊ शकते. न्याय मिळाला नाही अथवा अन्यायाची भावना निर्माण झाल्यावर अगोदर कायदेशीर मार्गानेच लढण्याचा प्रयत्न असतो. नंतर रस्त्यावर उतरावे लागते. जेव्हा समाजात जागरूकता शिल्लक असते तेव्हा लोकही या लढ्यात सामील होतात. निर्भया प्रकरणात आणि जेसिका लालपासून नैना साहनी आणि आरूषी तलवारपर्यंतच्या अनेक प्रकरणात गुन्ह्याचे स्वरूप वेगवेगळे असले तरी समाजाने जागरूकता दाखवली आहे. हे देशाने अनुभवले आहे.

महिलांच्या विरोधातील गुन्ह्यांवर अंकुश आणण्याच्या चर्चा कायम होतात. त्यांच्यावरच्या अत्याचाराच्या विशेषत: बलात्कारासारख्या गंभीर गुन्ह्यात आरोपींना त्वरित आणि कठोर शिक्षा झाली पाहिजे अशी अपेक्षा असते. राज्यांच्या विधानसभांपासून संसदेपर्यंत कठोर कायदे तयार केले गेले. असे असतानाही अत्याचार रोखण्यात तेवढे यश अद्याप आले नाही. आरोपीला अशा गुन्ह्यासाठी मृत्युदंडाचीच शिक्षा झाली पाहिजे अशी एकीकडे मागणी आणि समाज स्वास्थ्य टिकवून ठेवण्यासाठी ते आवश्यक असतानाही प्रभावशाली लोकांची जर प्रकरण थंड झाल्यासारखे दिसू लागल्यावर सुटका होत असेल तर अशा घटना कधीच थांबणार नाहीत. कायदा नक्की काय आणि कसे या घटनांकडे पाहतो हाच प्रश्न यामुळे निर्माण होतो.

# बीडमध्ये भाजप इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती

**बीड । प्रतिनिधी**

**बीडमध्ये जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती आणि मार्गदर्शन बैठकीचे आयोजन रविवारी (दि.२८) करण्यात आले. यावेळी इच्छुकांची प्रचंड गर्दी झाल्यामुळे थेट मुलाखतीऐवजी अर्ज स्वीकारण्याच्या सूचना निरीक्षकांनी केल्या. त्यानंतर ३०० हून अधिक इच्छुकांनी निवडणूक लढविण्यासाठी अर्ज दाखल केले आहे.**



या बैठकीस माजी मंत्री बदामराव पंडित, बाळराजे पवार, भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, डॉ.योगेश क्षीरसागर, जिल्हा सरचिटणीस ॲड.सर्जेराव तांदळे, भाजपचे निरीक्षक माधव निर्मळ, सतिश मुंडे, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे, बीड ग्रामीण मंडळ प्रमुख मनोज पाटील, राणा डोईफोडे, अशोक रसाळ आदी पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. निरीक्षकांच्या सूचनेवरून तालुकाध्यक्षांकडे इच्छुकांचे उमेदवारी अर्ज जमा करण्यात आले. यावेळी पदाधिकाऱ्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आगामी निवडणुकांमध्ये पक्षाची संघटनात्मक ताकद, बूथ पातळीवरील नियोजन, कार्यकर्त्यांचा सहभाग, जनतेशी संवाद वाढवण्यावर भर देण्यात आला. बैठकीदरम्यान इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेऊन त्यांच्या कामाचा आढावा, पक्षाशी असलेली निष्ठा, संघटनात्मक अनुभव, निवडणूक तयारीबाबत चर्चा करण्यात आली. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका लक्षात घेता पक्षशिस्त, एकजूट, समन्वय राखून काम करण्याचे आवाहन पदाधिकाऱ्यांनी केले.

### इच्छुकांची प्रचंड गर्दी

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इच्छुक उमेदवारांची सभागृहात प्रचंड गर्दी झाल्यामुळे निरीक्षकांच्या सूचनेवरून इच्छुकांचे केवळ अर्ज स्वीकारण्यात आले. यामध्ये ३०० हून अधिक अर्ज आल्याची माहिती भाजपच्या तालुकाध्यक्षांनी दिली आहे. साधारण प्रत्येक जिल्हा परिषद गटातून जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी २० ते २५ अर्ज प्राप्त झाल्याचे सांगितले आहे.

### ताकदीने कामाला लागण्याचे आवाहन

बीड तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्ष पूर्ण ताकदीने लढणार आहे. इच्छुक उमेदवारांची मोठी संख्या ही पक्षाची वाढती ताकद आणि येणाऱ्या विजयाची नांदी आहे. त्यामुळे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकदिलाने, शिस्तबद्ध पद्धतीने काम करून पक्षाला घवघवीत यश मिळवून द्यावे, असे आवाहन भाजपच्या नेत्यांसह पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# नेकनूर जवळ बसच्या धडकेत एक ठार दोन जखमी

**नेकनूर । प्रतिनिधी**

**नांदेडहून पुण्याकडे निघालेल्या एसटी बसने मोटारसायकलला जोराची धडक दिल्याने यामध्ये एक जण जागीच ठार तर एकास गंभीर मार लागला. ही घटना सकाळी साडेअकराच्या सुमारास पाटील पेट्रोलपंपासमोर घडली. जखमीस बीड येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.**



किशोर निर्मळ (वय ५२ वर्षे, रा. नेकनूर) हे सकाळी आपली मोटारसायकल (क्र. एम.एच. ४४ ए. डी. ३६६६) यावर एका साथीदारासमवेत जात होते. नेकनूरजवळील पाटील पेट्रोल पंपासमोर त्यांच्या मोटारसायकलला नांदेडहून पुण्याकडे निघालेली एसटी बस क्र. एम.एच. २० बी.एल. ४०५२) ने जोराची धडक दिली. यामध्ये किशोर निर्मळ हे जागीच ठार झाले तर त्यांच्या सोबत असलेले अन्य एकजण जखमी झाल्याने त्यांना पुढील उपचारार्थ बीड येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# आ.धस यांच्या प्रयत्नातून महामार्गासाठी अतिरिक्त भूसंपादन निधीचा मार्ग मोकळा

**पाटोदा । प्रतिनिधी**

**पैठणशिरूर (कासार)खरडा या एनएच७५२ राष्ट्रीय महामार्गाच्या रखडलेल्या कामांसाठी आमदार सुरेश धस यांनी ४ डिसेंबर रोजी केंद्रीय रस्ते परिवहन व राजमार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पत्राद्वारे केलेल्या मागणीची केंद्र सरकारने तातडीने दखल घेतली आहे. यामुळे महामार्गाच्या दोन्ही पॅकेजसाठी आवश्यक असलेल्या अतिरिक्त भूसंपादन निधीचा मार्ग मोकळा झाला आहे.**

आमदार धस यांनी आपल्या पत्रात एनएच७५२ अंतर्गत पैठणशिरूर (कासार) आणि शिरूर (कासार)खरडा या दोन्ही पॅकेजमधील भूसंपादनातील वाढीव खर्चाची वस्तुस्थिती केंद्राच्या निदर्शनास आणून दिली होती. प्रत्यक्ष संयुक्त मोजणीनंतर भूसंपादन क्षेत्र व खर्चात मोठी वाढ झाल्यामुळे उर्वरित रस्ता कामे रखडल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. दोन्ही पॅकेजमधील बहुतांश गावांचे भूसंपादन पुरस्कार जाहीर झाले असून सुमारे ८० टक्के रस्ता कामे पूर्ण झाली आहेत. मात्र अतिरिक्त निधीअभावी उर्वरित कामे थांबली असल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर रस्ते परिवहन व राजमार्ग मंत्रालयाच्या तांत्रिक सल्लागारांनी संबंधित प्रादेशिक अधिकारी व मुख्य अभियंत्यांना भूसंपादन कायदा व मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. आ.सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे केंद्र सरकारकडून ठोस हालचाली सुरू झाल्या असून, या निर्णयामुळे पाटोदा, आष्टी, शिरूर (कासार) व परिसरातील नागरिक, शेतकरी आणि वाहनचालकांना मोठा दिलासा मिळणार आहे. लवकरच उर्वरित महामार्ग कामे पूर्ण होतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे



# माता नर्मदा परिक्रमा पूर्ण करून गुरुवर्य महंत शिवाजी महाराज यांचे नारायणगड येथे आगमन

**बीड । प्रतिनिधी**

**माता नर्मदा परिक्रमा यशस्वीरीत्या पूर्ण करून श्री क्षेत्र नारायणगडचे मठाधिपती गुरुवर्य महंत शिवाजी महाराज यांचे मंगळवार, दि. ३० डिसेंबर २०२५ रोजी श्री क्षेत्र नारायणगड येथे भव्य आगमन होणार आहे.**



या पावन प्रसंगी मंगळवार, दि. ३० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ठीक ८ वाजता गेवराई येथे बाबांचे भक्तिभावाने स्वागत करण्यात येणार असून त्यानंतर श्री क्षेत्र नारायणगडपर्यंत भव्य स्वागत रॅलीद्वारे मार्गक्रमण करण्यात येणार आहे. ही स्वागत रॅली गेवराई येथून प्रारंभ होऊन गढी पाडळसिंगी, मादळमोही फाटा, पोखरी फाटा, सिरसमार्ग, पारगाव सिरस, सोनगाव, दिमाखवाडी-साक्षाळ पिंप्री, पौंडुळ फाटा मार्गे श्री क्षेत्र नारायणगड येथे समारोप होणार आहे. माता नर्मदा परिक्रमा पूर्ण केल्याबद्दल गुरुवर्य महंत शिवाजी महाराज यांच्या दर्शनासाठी व स्वागतासाठी परिसरातील भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून श्री क्षेत्र नारायणगड सर्व भक्तगणांच्या वतीने भाविकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या भव्य स्वागत रॅलीत सहभागी होऊन गुरुवर्य महंत शिवाजी महाराजांचे दर्शन व आशीर्वाद घेण्याची संधी साधावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# प.पू.गुरुमाऊली आयुर्वेद कॉलेज व फिजिओथेरपी कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजि सर्वरोग निदान शिबिर

**माजलगाव । प्रतिनिधी**

ग्रामीण भागात शेतकरी शेतमजूरांची संख्या अधिक असते आणि त्यांच्यात गुडघे दुखी मान दुखी मणक्याचे विकार त्वचारोग विशेषतः स्त्रियांमधील दुर्धर आजार व कर्क रोगाचे प्रमाण अधिक सापडते परंतु शेतीतील कामे व आर्थिक परिस्थिती या मुळे या आजारांकडे त्यांच्याकडून दुर्लक्ष होते हे आजार बळावतात ही बाब लक्षात घेऊन सदगुरू प.पू. मोरेदादा चॅरिटेबल हॉस्पिटल अँड मेडिकल ट्रस्ट त्रंबकेश्वर नाशिक यांचेकडून महाराष्ट्रभर मोफत नाडी तपासणी व सर्वरोग निदान आरोग्य शिबिराचे आयोजन केले जाते त्याचाच एक भाग म्हणून प.पू. गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेद कॉलेज व गुरुकृपा कॉलेज ऑफ फिजिओथेरपी मालीपारगाव यांच्या संयुक्त विद्यमाने धर्मेवाडी या छोट्याशा गावात घेण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिरात जवळपास १०० रुग्णांची तज्ज्ञ डॉक्टर्स कडून सांधे दुखी मान दुखी मणक्याचे विकार तसेच मधुमेह उच्च रक्तदाब यासाठी बी.पी.शुगर इसीजी इत्यादी आरोग्य तपासणी करण्यात आली यात नाशिक येथीलप.पू. गुरुमाऊली ट्रस्ट तर्फे डॉ.मोहनराव गवरकर यांनी उपस्थित रुग्णांना नाडी परीक्षण व आयुर्वेदिक उपचार यावर विस्तृत माहिती देऊन मधुमेह उच्च रक्तदाब व तपासणीविना लपलेल्या इतर आजारावर ऍलिओपॅथी बरोबरच आयुर्वेद व फिजिओ थेरपी उपचार कसे प्रभावी ठरतात याबद्दल माहिती दिली.यावेळी आयुर्वेदिक कॉलेज कडून डॉ.प्रा.डॉ. गिरीश कुलकर्णी प्रा.डॉ.कल्पना वर्मा डॉ.उज्वल सिंग सोलंकी यांनी रुग्णांची आरोग्य तपासणी केली तर फिजिओ थेरपी कॉलेजच्या सपना आढे अनिमेश अहिरे अनुजा धाडगे यांनी फिजिओथेरपी उपचार केले गुरुमाऊली आयुर्वेद कॉलेज कडून अभिजित लांधी आदित्य लेंढाळ सायली कुलकर्णी शिवांजली मेनुरे यांनी आलेल्या रुग्णावर उपचारासाठी सहकार्य केले. या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे रीतसर उदघाटन रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष रो.पांडुरंग चांडक यांनी केले. यावेळी रोटरी क्लब चे रो.अण्णासाहेब तौर रो.इंजि.गजेंद्र खोत रो. प्रभाकर शेटे उपसरपंच रेवण यादव काशिनाथ कोरडे इत्यादी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्र संचलन पतंजलीचे संग्राम ठोंगे यांनी केले तर हे आरोग्य शिबीर यशस्वी करण्यासाठी सोपान वीर,प्रल्हाद हुंबे,अशोक मुठाळ, दत्तात्रय शिरसाट, महादेव सुरवसे, तुकाराम कोरडे, नवनाथ यादव, रामप्रसाद कोरके, अर्जुन वीर, आकाश यादव,नवनाथ यादव,सोपानराव यादव यांनी परिश्रम घेतले.

# अंबडमध्ये गोरक्षकांचा रस्ता रोको करून पोलीस ठाण्यावर मोर्चा

**जालना । प्रतिनिधी**

**गोवंश तस्करी व हत्येप्रकरणी दोषींवर कठोर, कारवाई करण्यासाठी तसेच अजामीनपात्र कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशा मागण्या करण्यात आल्या.**



अंबड शहरात गोरक्षकांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात चक्का जाम आंदोलन केले. यावेळी आंदोलकांनी स्थानिक पोलिस प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करत गोवंश तस्करांवर कारवाई करण्यात हलगर्जीपणा केल्याचा आरोप करण्यात आला तसेच पोलीस ठाण्यावर मोर्चा काढण्यात आला. काही दिवसापूर्वी गोवंशाने भरलेला एक ट्रक पकडून पोलिसांच्या ताब्यात दिला होता. मात्र पोलिसांनी संबंधित तस्करांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याऐवजी, जप्त केलेला गोवंश पुन्हा संशयितांच्या ताब्यात दिल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. त्यानंतर त्या गोवंशाची हत्या करण्यात आल्याचा दावाही त्यांनी केला. या घटनेमुळे संतप्त झालेल्या गोरक्षकांनी रस्त्यावर ठिय्या आंदोलन करत वाहतूक पूर्णपणे ठप्प केली. त्यामुळे शहरातील मुख्य मार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आणि नागरिकांचे हाल झाले. कथितपणे तस्करांना मदत करणाऱ्या संबंधित पोलिस अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे, गोवंश तस्करी व हत्येप्रकरणी दोषींवर कठोर, अजामीनपात्र कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशा मागण्या करण्यात आल्या. आंदोलना दरम्यान गोरक्षकांनी हनुमान चालीसाचे पठण केले तसेच विविध घोषणा दिल्या. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस व प्रशासकीय अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी निष्पक्ष चौकशीचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले आणि वाहतूक सुरळीत करण्यात आली. दरम्यान, पोलीस प्रशासनाने या प्रकरणाची चौकशी सुरू असून वस्तुस्थितीनुसार पुढील कारवाई केली जाईल, असे सांगितले आहे.

## पान १ वरून...

### मराठवाड्यात २३ लाख

घेऊन प्रयत्न करण्याचे ठरले. मात्र, आत्तापर्यंत पेरणीचा अहवाल लक्षात घेता मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांपैकी छत्रपती संभाजीनगर, जालना व धाराशिव या तीनही जिल्ह्यांत अजून अपेक्षित पेरणी झाली नाही.

-----------------

### मुंबई मनपासाठी काँग्रेसने वंचितला

वाटपावर चर्चा सुरु आहेत. काँग्रेसने शरद पवार पक्षाला केवळ ९ जागा सोडण्याची तयारी दाखवल्याची माहिती समोर येत आहे. सध्या दोन्ही पक्षात जागा वाटपावर चर्चा सुरु असल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे काँग्रेस मुंबईत किती जागा लढवणार? याबाबत जाहीर केले नसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. दरम्यान, मागील दोन दशकांपासून काँग्रेसच्या अनेक नेत्यांनी प्रकाश आंबेडकर यांच्या पक्षासोबत युती करण्याचा प्रयत्न केला होता. माणिकराव ठाकरे, अशोक चव्हाण, बाळासाहेब थोरात आणि नाना पटोले यांनी अनेकदा हा प्रयत्न केला, पण गणित सुटले नाही. पण आता प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी हे युतीचे गणित यशस्वीरीत्या सोडवले आहे. गांधी टोपी, नेहरू जॅकेट आणि धोतर या पारंपरिक लुकमध्ये सपकाळ यांनी आघाडीची घोषणा केली. हर्षवर्धन सपकाळ यांच्या लुकची जोरदार चर्चा आता राजकीय वर्तुळात रंगली आहे. युतीमुळे काँग्रेसला प्राबल्य वाढवता येईल की नाही, हे पुढील काळात पाहणे बाकी आहे, पण संकेत स्पष्ट आहेत की, आता काँग्रेसवंचित बहुजन आघाडी एकत्रितपणे मैदानात उतरायला सज्ज आहे.

-----------

### मुंबईत शरद पवारांची

शरदचंद्र पवार पक्ष देखील सहभागी असणार आहे. गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष मुंबईत कोणाबरोबर जाणार याबाबतची चर्चा सुरु होती. अखेर हा मुद्दा निकाली निघाला आहे. शरद पवार यांच्या पक्षाची ठाकरे बंधूंबरोबर युती झालेली आहे. त्यामुळे आता महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेना ठाकरे गटाच्या मदतीला शरद पवारांचा पक्ष आला आहे. यामुळे मुंबईत ठाकरे बंधूंना बळ मिळणार असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने काँग्रेस पक्षाबरोबर देखील चर्चा केली होती. मात्र, त्यांच्यासोबत जाण्यासंदर्भात काही निर्णय झाला नाही. त्यानंतर अखेर ठाकरे बंधूबरोबर युती झाल्याची माहिती समोर आली आहे.

-------------

### सौर पंप तक्रारींसाठी

सुरू असलेल्या पंपातील तांत्रिक बिघाड यांसारख्या समस्यांमुळे शेतकरी त्रस्त होते. यावर तोडगा म्हणून महावितरणने हे विशेष पाऊल उचलले आहे. या पोर्टलमुळे तक्रार निवारण प्रक्रियेत पारदर्शकता येणार असून शेतकऱ्यांचा वेळ आणि श्रम वाचणार आहेत. अशी नोंदवा तुमची तक्रार: तक्रार नोंदवण्यासाठी शेतकऱ्यांनी सर्वप्रथम महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळावर (www.mahadiscom.in) जावे. होमपेजवर डाव्या बाजूला असलेल्या 'मागेल त्याला सौर कृषी पंप योजना' या टॅबवर क्लिक करावे. त्यानंतर 'तक्रार निवारण' विभागात जाऊन 'रजिस्टर कम्प्लेन्ट' हा पर्याय निवडावा. येथे आपला लाभार्थी क्रमांक, मोबाईल क्रमांक किंवा जिल्हा, तालुका व गावाचे नाव टाकून आपली समस्या सविस्तरपणे मांडता येईल. विशेष म्हणजे, नोंदवलेल्या तक्रारीचे सद्यस्थिती काय आहे, याचा आढावा घेण्याची सोयही याच पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. महावितरणच्या या पुढाकारामुळे राज्यातील शेती व्यवसायाला अधिक गती मिळण्याची चिन्हे आहेत.

------------

### राष्ट्रवादी पक्ष फोडण्यामागे

अदानींना मुंबई गिळण्यासाठी उत्तेजन दिले जात आहे, हे मुंबई आणि मराठी माणसासाठी अत्यंत घातक आहे, अशी टीका त्यांनी यावेळी केली.

----------

### दर्शनासाठी पंतप्रधान नरेंद्र

गडावरील या सोहळ्यासाठी निमंत्रण दिले आहे. विशेषता याच दरम्यान देशाच्या पंतप्रधानांना देखील निमंत्रण दिले जावे याच भावनेतून मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधानांना गहिनीनाथ गडावर या सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी सोहळ्यात येण्यासाठी निमंत्रण दिले असल्याचे समजते. या सोहळ्यानिमित्त गहिनीनाथ गडावर गेल्या एक महिनाभरापासून महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली तयारी सुरू आहे. अद्याप पंतप्रधानांचा दौरा किंवा तारीख निश्चित नसली तरी ३ जानेवारी ते १० जानेवारी २६ यादरम्यान हा सोहळा होत असल्याने त्यादरम्यानच मुख्यमंत्री, पंतप्रधान, राज्यातील मंत्री मंडळातील मंत्री गण उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

-----------

### तुळजापुरात शाकंभरी नवरात्र

देवींचे दरवर्षी दोन प्रमुख उत्सव साजरे केले जातात. त्यामध्ये अश्विन महिन्यातील शारदीय नवरात्र उत्सव व पौष महिन्यातील शाकंभरी नवरात्र उत्सवाचा समावेश आहे. शाकंभरी नवरात्र उत्सवाला तुळजापुरात 'धाकटा दसरा' असेही म्हटले जाते. तत्पूर्वी गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेली श्री तुळजाभवानी देवींची मंचकी निद्रा संपवून पहाटे पौष शुक्ल अष्टमीच्या शुभमुहूर्तावर देवींची सिंहासनावर विधीवत प्रतिष्ठापना करण्यात आली. सात दिवस चालणाऱ्या या शाकंभरी नवरात्र महोत्सवाची सांगता ३ जानेवारी रोजी शाकंभरी पौर्णिमेला दुपारी १२ वाजता पूर्णाहुती व त्यानंतर घटोत्थापनाने होणार आहे.

-------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि. २९ डिसेंबर २०२५



## थोडक्यात



### अंबादास चिक्षे यांचा सत्कार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील निवृत्त शिक्षक तथा किर्तनकार ह.भ.प.अंबादास चिक्षे यांना वसुनंदिनी फाऊंडेशन व एम.के. बेंचर्स जामनेर यांच्या वतीने साने गुरूजी आदर्श शिक्षक भूषण पुरस्कार नुकताच प्राप्त झाला.त्या बद्दल सुरताल संगीत विद्यालयाच्या वतीने अंबादास चिक्षे गुरूजी यांचा सत्कार सुरताल संगीत विद्यालयाचे अध्यक्ष सत्यवान शिंदे, उपाध्यक्ष राहूल देशपांडे,अमोल महाराज घोडके,अभय जोशी,संजय अंकुलवार, जगताप नाना, दशरथ कदम आदींच्या उपस्थितीत करण्यात आला.

### मोठीवाडीच्या बापु वऱ्हाडे यांचा प्रगतिशील साहित्य संमेलनात सन्मान

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठीवाडी येथील रहिवासी असलेले मराठी साहित्याचे लेखक बापु वऱ्हाडे यांनी कथालेखन स्पर्धेत सहभाग नोंदवत आपल्या उत्कृष्ट कथालेखनाने अव्वल पाच कथांमध्ये स्थान पटकावले असून त्यांचा छत्रपती संभाजीनगर येथील प्रगतिशिल साहित्य संमेलनात संमेलन अध्यक्ष उत्तम बावस्कर, प्रशांत मोरे, राकेश वानखेडे, श्रीमंतराव शिसोदे, प्रा.जयदेव डोळे, डॉ.किशोर शिरसाट, दत्ता कानवटे, रोशनी शिंपी, अनिकेत म्हस्के यांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला.




मोठीवाडी येथील रहिवासी असलेले प्रा. बापु भास्करराव वऱ्हाडे यांनी विवेकानंद महाविद्यालय आणि प्रगतशील लेखक संघ यांच्या वतीने आयोजित कथा लेखन स्पर्धेत सहभाग नोंदवला होता, ही स्पर्धा प्रगतिशील साहित्य संमेलन, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित केली होती, या कथालेखन व काव्यवाचन स्पर्धेत ६०-७० कवी व ५० कथालेखक स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. यामध्ये स्पर्धेस पात्र ५० कथांपैकी पाच कथांची निवड करण्यात आली. यामध्ये बापू वऱ्हाडे यांच्या 'अवकाळी स्वप्नांची केवायसी' या कथेची पहिल्या ५ कथांमध्ये निवड करण्यात आली. या त्यांच्या उत्कृष्ट लेखनाबद्दल प्रगतिशिल साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ कथाकार, कादंबरीकार उत्तम बावस्कर, उद्घाटक प्रसिद्ध कवी, गीतकार प्रशांत मोरे, प्रमुख अतिथी प्रसिद्ध कादंबरीकार राकेश वानखेडे, स्वागताध्यक्ष विवेकानंद शिक्षण संस्थेचे सहसचिव मा.श्रीमंतराव शिसोदे, लेखक, विचारवंत प्रा.जयदेव डोळे, डॉ.किशोर शिरसाट, पत्रकार दत्ता कानवटे, रोशनी शिंपी, अनिकेत म्हस्के आदी मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या त्यांच्या यशाबद्दल माजी मुख्याध्यापक विठ्ठल सोळंके, प्रविण घोडके, प्रा. डॉ. संतोष रणखांब, ड. नारायण गोले, ड. पांडुरंग गोंडे, ड. तुळशीराम रेडे,डॉ.रामदास सोळंके,विठ्ठल घोडके,रणजित जाधव,भारत पास्टे, प्रा.नारायण सोळंके, संभाजी पाष्टे,पत्रकार राजाभाऊ पाष्टे, भगवान पवार, दशरथ खेत्री,गणेश दहिभाते,भागवत खेत्री, यांच्यासह सर्व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

# नवनिर्वाचितांची बॅनरबाजी बोकाळली! बीडकरांच्या जीवाशी खेळ !

## निवडणूक जिंकली म्हणजे नियम पायदळी तुडवायचे का? वाहतुकीला अडथळा; नगरपरिषदेचे दुर्लक्ष

बीड । प्रतिनिधी

बीड नगरपरिषद निवडणुकीत जनतेने मोठ्या अपेक्षेने निवडून दिलेल्या नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींनी पदभार स्वीकारण्यापूर्वीच कायदे व नियमांना हरताळ फासल्याचे चित्र शहरात दिसून येत आहे. सर्वपक्षीय विजयी उमेदवारांनी सत्तेची धुंदी चढताच कायद्याच्या चौकटीला तिलांजली देत विजयानंतर शहरभर अनधिकृत बॅनर व होर्डिंग्ज लावून सर्वसामान्य नागरिकांना त्रास दिला जात असल्याचे स्पष्ट होत आहे.

निवडणूक जिंकली म्हणजे नियम धाब्यावर बसवायचे का? असा थेट सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी उपस्थित केला आहे.



बीड शहरातील प्रमुख बाजारपेठ असलेल्या सुभाष रोड परिसरात विजेच्या खांबांवर मोठ्या प्रमाणात अनधिकृत बॅनर लावण्यात आले आहेत. या बॅनरमुळे दुचाकी व चारचाकी वाहनचालकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. काही ठिकाणी तर बॅनर रस्त्यावर झुकल्याने अपघाताचा गंभीर धोका निर्माण झाला आहे.

निवडणुकीपूर्वी आचारसंहिता व नियमांचे पाठ वाचवणारी नगरपरिषद, निवडणूक संपताच मात्र या अनधिकृत बॅनरबाजीबाबत पूर्णपणे डोळेझाक करत असल्याचे चित्र आहे. शहर स्वच्छता, सौंदर्यीकरण व नागरिकांच्या सुरक्षिततेची जबाबदारी असलेल्या नगरपरिषदेची भूमिका त्यामुळे संशयास्पद ठरत आहे.

अनधिकृत बॅनरबाजीबाबत नगरपरिषदेकडे विचारणा केली असता, मुख्याधिकारी, नगरपरिषद बीड यांनी सर्व अनधिकृत बॅनरवर कारवाई केली जाईल असे सांगितले. मात्र प्रत्यक्षात अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली दिसून येत नाही. यामुळे शहराची जबाबदारी सांभाळणाऱ्या नवनिर्वाचित नगरसेवकांनी निवडणूक जिंकली म्हणजे नियम धाब्यावर बसवायचे का? असा सवाल पुन्हा एकदा डॉ. गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, उद्या दि. २९ डिसेंबर (सोमवार) रोजी अनधिकृत बॅनरबाजी करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी नगरपरिषद बीड कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

# खराब ज्वारीच्या वाटपाला स्थगिती मात्र जबाबदारांवर गुन्हे दाखल कधी?

## सामाजिक कार्यकर्ते ललित आब्बड यांचा सवाल

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यात शिधापत्रिका धारकांना वितरित करण्यात येणाऱ्या भरडधान्य ज्वारीच्या गुणवत्तेबाबत मोठा प्रकार उघडकीस आला असून, नागरिकांनी व अरिहंत नेहरू युवा चे ललित आब्बडच्या तक्रारीनंतर जिल्हा प्रशासनाने संबंधित ज्वारीचे वितरण तूर्तास स्थगित केले आहे. मात्र, अशी निकृष्ट व खाण्यायोग्य नसलेली ज्वारी पुरवठा करणाऱ्या पुरवठादारांवर आणि यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई कधी होणार? असा थेट सवाल सामाजिक कार्यकर्ते ललित आब्बड यांनी उपस्थित केला आहे.

गेल्या काही महिन्यांपासून बीड तालुक्यातील रेशनधारकांना अत्यंत निकृष्ट दर्जाची, दुर्गंधीयुक्त व खाण्यायोग्य नसलेली ज्वारी वितरित केली जात होती. या ज्वारीचा वापर न होऊ शकल्याने अनेक गरीब कुटुंबांना ती ज्वारी घरातच पडून ठेवावी लागली. ही बाब गंभीर असतानाही संबंधित रेशन दुकानदार, पुरवठादार तसेच पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात येत आहे.

तक्रारी दिल्यानंतर नंतर जिल्हा प्रशासनाने अखेर दखल घेत जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांना तातडीची कार्यवाही करण्याचे आदेश दिले असून, सदर ज्वारीचे वितरण तात्पुरते बंद करण्यात आले आहे. मात्र, ही केवळ तात्पुरती मलमपट्टी असून दोषींवर ठोस कारवाई होणे गरजेचे असल्याचे मत ललित आब्बड यांनी पत्रकातून व्यक्त केले आहे. महत्त्वाचे म्हणजे, जिल्हा पणन अधिकाऱ्यांनी या ज्वारीचा दर्जा उत्कृष्ट असल्याचा अहवाल सादर केला होता. त्याच अहवालाच्या आधारे जिल्हा पुरवठा कार्यालयाने १० ऑक्टोबर, २२ नोव्हेंबर व १९ डिसेंबर २०२५ रोजी जिल्ह्यासाठी ज्वारीचे नियतन मंजूर केले होते. प्रत्यक्षात मात्र ही ज्वारी खाण्यास अयोग्य असल्याचे स्पष्ट झाल्याने या अहवालांची विश्वासार्हता संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. जर ज्वारी खरोखरच उत्कृष्ट दर्जाची होती, तर नागरिकांच्या ताटात ती पोहोचण्यापूर्वीच निकृष्ट कशी ठरली? असा सवाल उपस्थित करत, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून पुरवठादार, संबंधित अधिकारी तसेच अहवाल देणाऱ्या यंत्रणेवर कठोर कारवाई करावी, अशी ठाम मागणी ललित आब्बड यांनी केली आहे.

## पान ६ वरून...

### संत वामनभाऊ ५० वा

दयनीय बनली आहे. पण चिखली ते चिंचोली . निवडुंगा ते चिंचोली आदी रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून डांबराचा थर उखडल्यामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पायी जाणाऱ्या भाविकांसाठीही हा रस्ता धोकादायक ठरत आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांसाठी या खड्डेमय रस्त्यावरून प्रवास करणे जोखमीचे बनले आहे. पुण्यतिथी सोहळ्यासाठी हजारो भाविक गहिनीनाथ गडावर दाखल होणार असून मान्यवरांची उपस्थितीही निश्चित असतानाही रस्त्याच्या दुरुस्तीकडे संबंधित यंत्रणांचे दुर्लक्ष होत असल्याची भावना ग्रामस्थांतून व्यक्त होत आहे.याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री साहेबांनी हेलिकॉप्टरने येण्याऐवजी गाडीने यावे आणि गहिनीनाथ गडाकडे जाणाऱ्या रस्त्याची दयनीय अवस्था प्रत्यक्ष अनुभवावी अशी संतप्त मागणी ग्रामस्थ व भाविकांकडून होत आहे.पुण्यतिथी सोहळ्यापूर्वी तातडीने रस्त्याची दुरुस्ती करून भाविकांसाठी सुरक्षित व सुलभ वाहतुकीची व्यवस्था करावी, अशी जोरदार मागणी सर्वसामान्य नागरिकांकडून केली जात आहे.

### अराजपत्रित संयुक्त पूर्व

स्वरूपाची जाहिरात उशिरा प्रसिद्ध झाल्याने राज्य शासनाने स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करून उमेदवारांना एक वर्षाची सवलत प्रदान केली होती. तसेच याच वर्षीच्या पोलिस शिपाई भरतीमध्ये सुद्धा वय सवलत देण्यात आली होती. ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन अराजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ अंतर्गत पोलिस उपनिरीक्षक पदासाठी इच्छुक परीक्षार्थींना एक वर्ष वयाची सवलत देण्यात यावी किंवा त्यानुसार वयोमर्यादा ग्राह्य धरण्याच्या तारखेत बदल करण्यात यावा, अशी विनंती धनंजय मुंडे यांनी त्यांच्या पत्रात केली आहे.

### डॉ.सारिकाताई क्षीरसागर

विकासासाठी भाजपचे सर्व नगरसेवक लोकांमध्ये राहून, थेट संपर्कातून काम करतील, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. शहरातील बदलत्या परिस्थितीनुसार नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या सूचना, तक्रारी व अपेक्षांचा पाठपुरावा करून त्या पूर्ण होईपर्यंत संबंधित नगरसेवक व कार्यकर्ता कटिबद्ध राहील, असेही त्यांनी म्हटले. बीड हे आपल्या सर्वांचे असून, शहरावर प्रत्येक नागरिकाचा हक्क आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. याप्रसंगी सहकारी नगरसेवक सनी माने, नगर परिषदेच्या स्वच्छता विभागातील कर्मचारी तसेच प्रभागातील नागरिक उपस्थित होते.

### गेवराई तालुक्यातील सर्व

आनंद व्यक्त झाला नाही. लोकांनी गुलाल उधळला नाही. मात्र नगर पालिका आमच्या ताब्यात येताच गेवराई शहरासह तालुकाभरात नागरिकांनी आनंद व्यक्त केला. आता मी आणि बाळराजे पवार एकत्र असल्याने जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचे सगळे सदस्य भाजपचेच निवडून येणार असा विश्वास व्यक्त करून, स्वयंघोषित गोदावरीचा वाघ गेवराईत न थांबता तिकडे बिंदुसऱ्याच्या काठावर फिरत आहे असा टोला बदामराव पंडित यांनी विजयसिंह पंडितांना लगावला.

बाळराजे पवार म्हणाले की, आता बदामराव आबा आणि मी एकत्र येऊन निवडणुकांना सामोरे जात आहोत. मनामध्ये कोणतीही गटबाजी न ठेवता खुल्या दिल्याने कार्यकर्त्यांनी एकत्र यावे. सामान्य कार्यकर्त्याला संधी आणि तालुक्याचा विकास साधायचा असेल तर यापुढे बीडच्या अमरसिंह पंडित आणि विजयसिंह पंडितांना कधीही गुलाल लागणार नाही यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे असे आवाहन केले. जशी नगर पालिका बहुमताने लोकांनी आपल्या ताब्यात दिली. त्याच पद्धतीने गेवराई पंचायत समितीवर आणि बीड जिल्हा परिषदेवर आजच भाजपचा झेंडा फडकला असा विश्वास व्यक्त करून बाळाचे पवार म्हणाले की जुने नवे करत बसू नका सगळे भाजपाचे या विचाराने पुढे चला असे आवाहन केले. जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख म्हणाले की माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि बाळराजे पवार हे शक्ती भक्तीप्रमाणे मोठ्या दिलाने एकत्र आल्यामुळे गेवराई तालुक्यात भाजपा मजबूत झाली आहे. येथे इच्छुकांची मोठी संख्या आहे मात्र जागा मर्यादित असल्याने निवडून येण्याचा निष्कर्ष ठेवून योग्य उमेदवाराला उमेदवारी दिली जाईल. उमेदवारी मिळाली नाही म्हणून नाराज होऊ नका असे आवाहन केले. बदामराव पंडित, बाळराजे पवार आणि शंकरराव देशमुख या तिघांनीही पंकजाताई मुंडे यांचे हात बळकट करण्यासाठी भाजपचेच सदस्य निवडून द्या असे आवाहन केले.याप्रसंगी संजय आंधळे, माधव निर्मळ नगरसेवक राजेंद्र राक्षसभुवनकर, प्रा पी टी चव्हाण, अंबादास पिसाळ, ॲड उद्धव रासकर, सुभाष शिंदे, शेख सिराज, आयुब पठाण यांनी समायोचित भाषणे केली. कार्यक्रमास माजी सभापती युधाजित पंडित, युवा नेते रोहित पंडित, युवानेते शिवराज पवार, युवानेते यशराज पंडित, माजी तालुकाप्रमुख प्रकाशराव सुरवसे, ॲड सुरेश हात्ते, गणेश लांडे, बाळासाहेब गायकवाड ज्ञानेश्वर खाडे, भाजपा गेवराई शहराध्यक्ष सचिन दाभाडे, गेवराई पूर्व अध्यक्ष राजेश पवार, गेवराई पश्चिम अध्यक्ष उद्धव रासकर आदींसह पदाधिकारी व इच्छुक उमेदवार हजारोंच्या संख्येने उपस्थित राहिल्याने बैठकीला विराट सभेचे स्वरूप आले होते.

### आ. धस यांच्या प्रयत्नातून

सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी कार्यरत असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी तालुक्यात विकासकामांचा वेग वाढला आहे. पुढील काळातही वाळुंज गावाच्या सर्वांगीण विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. या विकासकामांमुळे वाळुंज परिसरातील नागरिकांना सुरक्षितता, मूलभूत सुविधा व पर्यटन विकासाला चालना मिळणार असून, गावाच्या सर्वांगीण प्रगतीस हातभार लागणार आहे. या भव्य शुभारंभ सोहळ्याचे आयोजन ग्रामपंचायत कार्यालय व ग्रामस्थ, वाळुंज यांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी मा.सरपंच विष्णू खाडे,सरपंच सुरेश सातपुते,उपसरपंच बंडु सोले,चेअरमन अशोक राऊत,जेष्ठनेते लालासाहेब शिंदे,डॉ.अनिकेत खाडे,बबन सोले, रावसाहेब वहाटुळे,भरत सोले,झुंबर राऊत, जालु राऊत,लहू खाडे,संदीप डिसले,भाऊ खाडे,कुलकर्णी देवा,बालु खाडे,किशोर सोले,भरत वहाटुळे,दीपक क्षीरसागर यांच्यासह वाळुंज ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बाजीराव जगताप, मंगला सोळंके

नितीन नाईकनवरे, भाजपाचे नेते ज्ञानेश्वर मेंडके, उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले, तहसिलदार संतोष रूईकर, पोलिस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांची उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमास माजलगावकरांनी उपस्थित रहावे असे आवाहन पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम येवले, जेष्ठ पत्रकार महेंद्र मस्के, सचिव दिनकर शिंदे, कार्याध्यक्ष कमलेश जाब्रस, दत्ता येवले, जेष्ठ पत्रकार संतोष मुळी यांचेसह सर्व पत्रकार माजलगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# ज्योतिष विशारद मनोहर पोतदार (देवा) यांना 'गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय पुरस्कार' जाहीर

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथील शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या भगवान महाविद्यालयाच्या वतीने दिला जाणारा मानाचा 'गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय पुरस्कार' यंदा आष्टी येथील विठ्ठल मंदिराचे पुजारी आणि प्रसिद्ध ज्योतिष विशारद मनोहर पोतदार (देवा) यांना जाहीर करण्यात आला आहे. धार्मिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन हा सन्मान त्यांना प्रदान करण्यात येणार आहे.



गंगाई-बाबाजी महोत्सव समितीच्या वतीने दरवर्षी विविध क्षेत्रांत समाजासाठी बहुमोल कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित केले जाते. मनोहर पोतदार यांनी गेल्या अनेक वर्षांपासून आष्टी येथील विठ्ठल मंदिरात पुजारी म्हणून सेवा बजावतानाच धार्मिक व आध्यात्मिक क्षेत्रात मोठे कार्य केले आहे. त्यांच्या याच कार्याचा गौरव म्हणून २०२५ चा धार्मिक क्षेत्रातील राज्यस्तरीय पुरस्कार त्यांना घोषित झाला आहे.

हा गौरव सोहळा गुरुवारी, दि. १ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. माजी आमदार भीमरावजी धोंडे यांच्या शुभहस्ते आणि इतर मान्यवर अतिथींच्या उपस्थितीत हा पुरस्कार मनोहर पोतदार यांना प्रदान केला जाणार आहे. सन्मानचिन्ह, मानपत्र आणि पुष्पहार असे या पुरस्काराचे स्वरूप असणार आहे.

मनोहर पोतदार यांना हा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाल्याचे समजताच आष्टी तालुक्यात आनंदाचे वातावरण पसरले आहे. त्यांच्या निवडीबद्दल आष्टी तालुका दिव्यांग संघटना व सर्व पदाधिकारी, आष्टी पुरोहित संघ व पदाधिकारी, भगवान महाविद्यालय परिवारासह विविध संघटनांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे. धार्मिक क्षेत्रातील या मानाच्या पुरस्कारामुळे मनोहर पोतदार यांच्यावर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# व्यसनाधीनता ही गंभीर सामाजिक समस्या- मु.अ.परशुराम सोंडगे

गेवराई । प्रतिनिधी

युवक हे देशाचे आधारस्तंभ असतात. युवकच जर व्यसनाधीन झाले तर समाज आणि राष्ट्र प्रगती करु शकणार नाही. म्हणून व्यसनाधीनता ही गंभीर सामाजिक समस्या आहे. असे प्रतिपादन मु.अ. परशुराम सोंडगे यांनी केले. ते महिला महाविद्यालय, गेवराई येथे 'आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग' द्वारे आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे महिला महाविद्यालय, गेवराई च्या 'आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग' च्या वतीने 'व्यसनाधिनता आणि युवक: प्रतिबंध हाच सर्वोत्तम उपाय' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीप-प्रज्वलन व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी बोलताना मु.अ. परशुराम सोंडगे म्हणाले की, व्यसनाधीनता ही गंभीर सामाजिक समस्या आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात युवक स्वतः चे व परिवाराचे नुकसान करुन घेत आहेत. सिगारेट व तंबाखू वर वैधानिक इशारा असुन ही त्यांचे व्यसन केले जाते. व्यसनामुळे त्या व्यक्तीच्या कार्यक्षमतेवर वाईट परिणाम होतो. व्यसन हे अनूभव घेण्याची गोष्ट नाही. त्यामुळे क्षणभंगुर आनंदाच्या मागे धावू नका. मोहाच्या क्षणाला बळी पडू नका. असे प्रतिपादन त्यांनी केले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तात्याराम सोंडगे म्हणाले की, आधुनिक युग हे स्त्री पुरुष समानतेचे युग असुन आजकाल मुलींमध्ये ही व्यसनाधीनता वाढत आहे. सोशल मीडिया चा वापर वाढला आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थीनींनी स्वतः व्यसनमुक्त राहून आपल्या परिवारातील सदस्यांना व्यसनमुक्त ठेवण्यासाठी सजग राहीले पाहिजे. असे प्रतिपादन केले. यावेळी कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. दत्ता तंगलवाड यांनी सर्व विद्यार्थीनींना व्यसनमुक्ती ची शपथ दिली.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. दत्ता तंगलवाड यांनी केले. सुत्र संचालन प्रा. गोकुळदास कदम यांनी तर प्रा. डॉ. राजाभाऊ चव्हाण यांनी आभार मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती.

# पाटोद्यात रेशनमधून किड लागलेली ज्वारी; गोरगरिबांच्या आरोग्याशी खेळ

पाटोदा । प्रतिनिधी

शासनाच्या अन्नसुरक्षा व अंत्योदय योजनेचा उद्देश गरजू नागरिकांना पोषणमूल्ययुक्त धान्य पुरवण्याचा असताना, पाटोदा तालुक्यात मात्र रेशनच्या नावाखाली किड व अळ्या लागलेली ज्वारी वाटप केली जात असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या ज्वारीचा दर्जा इतका खालावलेला आहे की ती माणसांसाठी खाण्यायोग्य आहे की थेट टाकून देण्यासारखी, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

पाटोदा तालुक्यातील १८ हजार ३९५ कार्डधारकांसाठी एकूण १,८२३.३१ क्विंटल ज्वारीचा पुरवठा करण्यात आला आहे. मात्र शासनाकडून खरेदी झाल्यानंतर दीर्घकाळ गोदामात साठवणूक झाल्याने या ज्वारीला किड लागली असून अनेक ठिकाणी दुर्गंधी येत असल्याचे दिसून येत आहे. शिजवण्यायोग्य नसतानाही हीच ज्वारी रेशन दुकानांतून लाभार्थ्यांना दिली जात असल्याने तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. तालुक्यात १३१ रेशन दुकाने कार्यरत असून ९२५ अंत्योदय कार्डधारकांना ३५ किलो ज्वारी व ३५ किलो तांदूळ, तर १७ हजार ४७० अन्नसुरक्षा कार्डधारकांना प्रतिव्यक्ती २ किलो ज्वारी व तांदूळ दिले जात आहेत. मात्र पर्याय नसल्याने अशी ज्वारी घ्यावीच लागते, अशी हतबल प्रतिक्रिया गोरगरिबांकडून उमटत आहे. नाकारले तर उपासमार आणि स्वीकारले तर आरोग्याचा धोका, अशी दुहेरी कोंडी लाभार्थ्यांसमोर उभी राहिली आहे.

या गंभीर प्रकाराबाबत आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांच्या उपस्थितीत झालेल्या आढावा बैठकीत मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. यावेळी आमदार धस यांनी संबंधित अधिकाऱ्यांना, पुरवठा विभागामार्फत वितरित होणारे धान्य किमान माणसास खाण्यायोग्य असलेच पाहिजे, अशा स्पष्ट सूचना दिल्या होत्या. मात्र प्रत्यक्ष रेशन दुकानांमधील ज्वारीची अवस्था पाहता या सूचनांची अंमलबजावणी झाली आहे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे शिल्लक असलेल्या खराब ज्वारीचे पुढे काय करायचे, ती नष्ट केली जाणार की पुन्हा गोरगरिबांच्या वाट्याला येणार, तसेच या प्रकाराला जबाबदार कोण, असे गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. प्रशासनाकडून अद्याप ठोस भूमिका जाहीर न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.शासनाच्या योजना गोरगरिबांच्या हितासाठी असतात; त्यांच्या आरोग्याशी खेळ करण्यासाठी नव्हेत. दर्जाहीन व किड लागलेले धान्य वाटून गरिबांच्या पोटात विष घालण्याचा प्रकार थांबवावा, अशी जोरदार मागणी होत असून आमदार सुरेश धस यांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालून चौकशी करावी, खराब ज्वारीचे वितरण थांबवावे आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# दत्ता काकडे यांना गंगाई बाबाजी पुरस्कार जाहीर

आष्टी । प्रतिनिधी

शिक्षण महर्षी भीमरावजी धोंडे हे गेल्या अनेक वर्षापासून आपल्या आई-वडिलांच्या प्रित्यर्थ गंगाई बाबाजी या महोत्सवाच्या आयोजन करतात यामध्ये प्रत्येक क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते यामध्ये यावर्षी आदर्श सरपंच म्हणून पुरस्कार महाराष्ट्र सरपंच परिषदेचे अध्यक्ष दत्ता काकडे यांना सन्मानित केले आहे दत्ता काकडे हे आदर्श कीन्ही गावांमध्ये सरपंच म्हणून गावचा कारभार सांभाळून गावाचा कायापालट त्यांनी केला आहे पाणलोट मिशनच्या अंतर्गत गावामध्ये पाणी आडवा पाणी जिरवा च्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर जलसाठा निर्माण केला आहे या कामाची दखल घेऊन ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी देखील रक्त काकडे यांना सन्मानित केले होते अशा प्रकारे आज महाराष्ट्रामध्ये सरपंच परिषदेच्या माध्यमातून राज्य पातळीवर काम करत असताना त्यांनी मोठ्या प्रमाणावर संघटन निर्माण केले आहे महाराष्ट्रातील सरपंचांना शासन दरबारी होत असलेल्या अडचणी तसेच विविध विषयावर ते महाराष्ट्रभर काम करत आहेत याच कामाची दखल घेऊन माजी आमदार शिक्षण महर्ष भिमरावजी धोंडे यांनी गंगाबाई बाबाजी पुरस्कारामध्ये आदर्श सरपंच म्हणून त्यांची करण्यात आली आहे पुरस्कार जाहीर झाल्यानंतर नंतर सर्वसाधारण त्यांचे कौतुक करण्यात आले.



# दिर्घ प्रतीक्षेनंतर सोयाबीनला भाव; लातूरमध्ये इतक्या रुपयापर्यंत दर

पुणे : बऱ्याच दिवसांच्या प्रतीक्षेनंतर अखेर सोयाबीनच्या दरात सुधारणा झाली आहे. लातूर बाजार समितीत सोयाबीनला ५ हजार रुपयांहून अधिक भाव मिळाल्याने शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत.यंदाच्या खरीप हंगामात अतिवृष्टी आणि निसर्गाच्या लहरीपणामुळे सोयाबीन उत्पादनाला मोठा फटका बसला. अनेक शेतकऱ्यांचे पीक पुरात वाहून गेले, तर काही ठिकाणी उत्पादनात लक्षणीय घट झाली. असे असतानाही बाजारभावात अपेक्षित वाढ होत नसल्याने सोयाबीन उत्पादक शेतकरी चिंताग्रस्त होते. मात्र,लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीत सोयाबीनच्या दराने पाच हजार रुपयांचा टप्पा ओलांडल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. यंदा अतिवृष्टीमुळे सोयाबीनमध्ये मोठ्या प्रमाणावर ओलावा आणि डॅमेज दिसून आले. त्यामुळे हमीभाव खरेदी केंद्रावर दर्जा निकष पूर्ण न झाल्याने अनेक शेतकऱ्यांचे सोयाबीन नाकारण्यात आले. परिणामी शेतकऱ्यांना नाईलाजाने खुल्या बाजारात कमी दराने माल विकावा लागला. यामुळे प्रतिक्विंटल ७०० ते १,००० रुपयांपर्यंत आर्थिक फटका शेतकऱ्यांना सहन करावा लागला. हंगाम सुरू झाल्यापासून सोयाबीनचे दर सातत्याने ४ हजार ५०० रुपयांच्या आसपासच रेंगाळत होते. वाढलेल्या उत्पादन खर्चामुळे खर्चही निघेनासा झाल्याने अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले होते. दर वाढतील या अपेक्षेने अनेक शेतकऱ्यांनी आपला सोयाबीनचा माल साठवून ठेवण्यालाच प्राधान्य दिले होते. गेल्या काही दिवसांपासून बाजारातील सोयाबीनची आवक मंदावली आहे. मालाची उपलब्धता कमी झाल्याचा थेट परिणाम आता दरावर दिसून येऊ लागला आहे. लातूर बाजार समितीत झालेल्या खरेदी-विक्री व्यवहारात सोयाबीनला कमाल ५ हजार १०० रुपये प्रतिक्विंटल, तर सर्वसाधारण दर ४ हजार ८०० रुपये इतका मिळाला. बऱ्याच दिवसांनंतर झालेली ही दरवाढ शेतकऱ्यांसाठी सुखावणारी ठरली आहे. लातूर बाजार समितीत तब्बल १५ हजार ४३१ क्विंटल सोयाबीनची आवक झाली. दर वाढल्याने आवक वाढल्याचे चित्र दिसून आले. चालू आठवड्यात मात्र आवक सरासरी ८ हजार क्विंटलच्या आसपास होती आणि सर्वसाधारण दर प्रतिक्विंटल ४,८०० रुपयांच्या आत-बाहेर होता.



पुढील काळात दर वाढणार?

बाजार तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, जर बाजारात सोयाबीनची आवक मर्यादित राहिली आणि मागणी वाढली, तर येणाऱ्या काळात सोयाबीनचे दर आणखी वधारण्याची शक्यता आहे. सध्या मिळालेल्या दरवाढीमुळे तरी शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला असून, पुढील आठवड्यांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८४५ : टेक्सास हे अमेरिकेचे २८ वे राज्य बनले.
१९३० : सर मुहम्मद इकबाल यांनी दोन राष्ट्र सिद्धांत तसेच पाकिस्तानच्या निर्मितीचा दृष्टीकोन मांडला.
१९५९ : नोबेल पारितोषिक विजेते रिचर्ड फाइनमॅन यांनी येथे हे प्रसिद्ध भाषण दिले. ही ची सुरुवात मानली जाते.
१९५९ : पोर्तुगालमधील लिस्बन येथे भुयारी रेल्वेची सुरूवात झाली.
१९७२ : कोलकता मध्ये मेट्रो रेल्वे च्या कामाला आजच्या दिवशी सुरुवात.
१९८३ : भारतीय क्रिकेटर सुनील गावस्कर यांनी वेस्ट इंडीस विरुद्ध २३६ रन बनविले, तेव्हा हा स्कोर कसोटी सामन्यामधील सर्वात जास्त होता.
२००६ : चीन ने राष्ट्रीय सुरक्षेसाठी श्वेत पत्र जारी केले.
२०१२ : पाकिस्तान मध्ये पेशावर जवळ आतंकवादी हल्यात २१ सुरक्षाकर्मी मरण पावले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८०० : चार्ल्स गुडईयर रबरावरील व्हल्कनायझेशन ही प्रक्रिया शोधणारे अमेरिकन संशोधक (मृत्यू: १ जुलै १८६०)
१८०८ : अँड्र्यू जॉन्सन अमेरिकेचे १७ वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: ३१ जुलै १८७५)
१८०९ : ब्रिटीश पंतप्रधान विल्यम ग्लँडस्टोन यांचा जन्म.
१८४४ : काँग्रेसचे पहिले अध्यक्ष व्योमकेशचंद्र बनर्जी यांचा जन्म.
१९०० : मास्टर दीनानाथ मंगेशकर शास्त्रीय व नाट्यसंगीत गायक व अभिनेते (मृत्यू: २४ एप्रिल १९४२)
१९०४ : कुपल्ली वेंकटप्पागौडा पुट्टप्पा उर्फ 'कुवेम्पू' ज्ञानपीठ विजेते कन्नड लेखक व कवी (मृत्यू: ११ नोव्हेंबर १९९४)
१९१७ : रामानंद सागर हिन्दी चित्रपट निर्माते (मृत्यू: १२ डिसेंबर २००५)
१९२१ : फेडरल रिपब्लिक ऑफ युगोस्लाव्हियाचे पहिले अध्यक्ष डोब्रिका कोसिक यांचा जन्म. (मृत्यू: १८ मे २०१४)
१९४२ : राजेश खन्ना चित्रपट अभिनेते, निर्माते आणि राज्यसभेचे सदस्य (मृत्यू: १८ जुलै २०१२)
१९७४ : अभिनेत्री ट्विंकल खन्ना यांचा जन्म.
१९६० : ओस्ट्रेलियन क्रिकेटपटू डेव्हिड बून यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९६७ : पण्डित ओंकारनाथ ठाकूर ऊर्फ 'प्रणव रंग' गायक व संगीत अभ्यासक, १९५५ मधे पद्मश्री पुरस्काराने सन्मानित (जन्म: २४ जून १८९७)
१९७१ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहकारी दादासाहेब गायकवाड यांचे निधन.
१९८० : भारतीय चित्रपट निर्माते नंदुभाई वकील यांचे निधन.
१९८६ : हॅरॉल्ड मॅकमिलन इंग्लंडचे पंतप्रधान (जन्म: १० फेब्रुवारी १८९४)
२००८ : प्रसिद्ध चित्रकार मंजीत बावा यांचे निधन.
२०१२ : टोनी ग्रेग इंग्लिश क्रिकेटपटू व समालोचक (जन्म: ६ आक्टोबर १९४६)
२०१३ : भारतीय लेखक आणि अनुवादक जगदीश मोहंती यांचे निधन. (जन्म: १७ फेब्रुवारी १९५१)
२०१४ : भारतीय-हाँगकाँगचे व्यापारी हरी हरिलेला यांचे निधन. (जन्म: १० ऑगस्ट १९२२)
२०१५ : पंजाबचे २५ वे राज्यपाल ओमप्रकाश मल्होत्रा यांचे निधन. (जन्म: ६ ऑगस्ट १९२२)

# कराडच्या कृषी प्रदर्शनात एआय तंत्रज्ञानावर भर

## शंभूराज देसाई यांच्या हस्ते उद्घाटन

कराड : शेतकऱ्यांना दरवर्षी काहीतरी नवीन देण्याची कराडच्या कृषी प्रदर्शनाची परंपरा आजही कायम असून या प्रदर्शनाचा शेतकऱ्यांना मोठा लाभ होत आहे, असे गौरवोद्गार राज्याचे पर्यटन मंत्री व सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शंभूराज देसाई यांनी काढले.

कराड कृषी उत्पन्न बाजार समिती, जिल्हा परिषद व महाराष्ट्र राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विसावे राज्यस्तरीय यशवंतराव चव्हाण कृषी, औद्योगिक व पशुपक्षी प्रदर्शन व जिल्हा कृषी महोत्सवाचे उद्घाटन ना. शंभूराज देसाई यांच्या हस्ते फीत कापून व दीतारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती मिळावी, या उद्देशाने स्वर्गीय यशवंतराव चव्हाण कृषी प्रदर्शनाची मुहूर्तमेढ रोवली. यंदाच्या प्रदर्शनात कृषी क्षेत्रातील 'एआय' (कृत्रिम बुद्धिमत्ता) तंत्रज्ञानावर विशेष भर देण्यात आला आहे. आज ९० टक्क्यांहून अधिक शेतकऱ्यांकडे अँड्रॉइड मोबाईल असल्याने या तंत्रज्ञानाचा मोठा लाभ शेतकऱ्यांना होणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा. आपला भारत देश कृषीप्रधान असून शेतकरी बळकट झाला तरच अर्थव्यवस्था मजबूत होईल. यावेळी ॲड. उदयसिंह पाटील उंडाळकर म्हणाले, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे, शेतीतील बदल व आधुनिक तंत्रज्ञान त्यांच्यापर्यंत पोहोचावे, यासाठी हे प्रदर्शन उपयुक्त ठरत आहे. यंदा एआय तंत्रज्ञानावर दिलेला भर शेतकऱ्यांसाठी निश्चितच लाभदायक ठरेल.

# बटाटा उत्पादक शेतकऱ्यांसाठी खुशखबर; सरकारने घेतला मोठा निर्णय

बटाटा उत्पादक शेतकऱ्यांसाठी मोठी आनंदाची बातमी समोर येत आहे. भारत सरकारच्या कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने आयसीएआर-केंद्रीय बटाटा संशोधन संस्था, शिमला यांनी देशभरात बियाणे उत्पादन आणि विस्तारासाठी विकसित केलेल्या चार नवीन बटाट्याच्या वाणांना अधिकृतपणे मान्यता दिली आहे. कुफरी रतन, कुफरी चिप भारत-१, कुफरी चिप भारत-२ आणि कुफरी तेजस अशी या ४ नव्या बटाटा वाणांची नावे आहेत. या नव्याने प्रसिद्ध झालेल्या वाणांना देशभरात दर्जेदार बियाणे म्हणून वापरण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे, सरकारच्या या निर्णयामुळे बटाट्याचे उत्पादन आणि प्रक्रिया क्षमता वाढवण्यासाठी नवीन संधी उपलब्ध झाल्या आहेत.



कुफरी रतन : हा मध्यम-पिकणारा (९० दिवस), उच्च-उत्पादन देणारा (३७-३९ टन/हेक्टर) लाल-कापलेला खाद्य बटाट्याचा प्रकार आहे. हा बटाटा उत्तर भारतीय मैदानी प्रदेश आणि पठारीय प्रदेशात सहजपणे उत्पादित करण्यात येतो. तो आकर्षक कंद तयार करतो ज्यांचे शेल्फ लाइफ जास्त आहे.

कुफरी तेजस : हरियाणा, पंजाब, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्रासह भारतीय मैदानी प्रदेशांसाठी योग्य असलेली उष्णता-सहनशील, मध्यम-पिकणारा (९० दिवस), उच्च-उत्पादन देणारा (३७-४० टन/हेक्टर) खाद्य बटाट्याचा प्रकार असून तो खोलीच्या तापमानात चांगला साठवता येतो.

कुफरी चिप भारत-१ : भारतीय मैदानी प्रदेशासाठी शिफारस केलेली मध्यम-पिकणारा (१०० दिवस), उच्च-उत्पादन देणारा (३५-३८ टन/हेक्टर) चिप प्रक्रिया करणारा प्रकार आहे. या बटाटा मध्ये कोरड्या पदार्थांचे प्रमाण जास्त (२१%), कमी साखर आणि मर्यादित रंगाचे चिप्स तयार होतात.

कुफरी चिप भारत-२ : ही बटाट्याची लवकर पिकणारी (९० दिवस), जास्तीत जास्त उत्पादन देणारी (३५-३७ टन/हेक्टर) चिप प्रक्रिया करणारी जात असून यामध्ये कोरड्या पदार्थांचे प्रमाण जास्त असते आणि उत्कृष्ट साठवणूक क्षमता असते, ज्यामुळे प्रोसेसरसाठी सातत्यपूर्ण पुरवठा होतो. आयसीएआर-सीपीआरआयचे संचालक डॉ. ब्रिजेश सिंग यांनी शास्त्रज्ञांचे त्यांच्या सततच्या योगदानाबद्दल अभिनंदन केले आणि शेतकरी समुदाय आणि बटाट्यावर आधारित उद्योगांसाठी हा महत्वाचा निर्णय असल्याचे म्हंटल. बटाट्याच्या या नव्या वाणामुळे बटाटाची उत्पादकता वाढेलच तसेच भारतातील बटाटा क्षेत्रालाही बळकटी मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# आडसाली उसाचे पाचट काढण्याचे फायदे



ऊस लागवड केल्यानंतर उसाचे पाचट काढावे की न काढावे या द्विधा मनस्थितीत शेतकरी असतो. आपण बघितले तर प्रत्येक उसाच्या पेऱ्याजवळ उसाचे पान असते. सुरुवातीची आणि शेवटची पाने अरुंद व निमुळती दिसतात. मध्यंतरीची पाने १ ते २ इंच रुंद असतात. ही पाने जवळपास १ मीटर लांबीची असतात. पूर्ण वाढ झालेल्या उसाला हिरवी १० पाने असतात.

उभ्या उसातील पाचट काढण्याचे फायदे :

उसातील वाळलेले पाचट काढल्यामुळे पिकामध्ये हवा खेळती राहते. सूर्यप्रकाश मुळापर्यंत जातो त्यामुळे वाटरशुट म्हणजेच कोंब वाढण्यास मदत होते तसेच उसाची जाडी वाढते. सरीमधून जाणे-येणे सोपे होते त्यामुळे उसाला खते घालणे, ड्रेंचिंग करणे ही कामे करणे सहजरीत्या करता येतात. उसामध्ये फिरता येत असल्यामुळे उसातील कीड व रोग लक्षात येतात, त्यामुळे उपाययोजना करणे सोपे होते. १ एकर क्षेत्रातून सरासरी २ ते ३ टन पाचट मिळते. १ टन पाचटापासून सरासरी २० कि.ग्रॅ. नत्र, १० कि.ग्रॅ. स्फुरद व १० ते २० कि.ग्रॅ. पालाश इतके खत मिळते. पाचटामुळे जमिनीवर आच्छादन झाल्यामुळे तण नियंत्रणासाठी फायदा होतो. तसेच पाचटाखाली जिवाणूंची चांगली वाढ होते.


उस पाचट काढताना घ्यायची काळजी : आडसाली उसाचे पाचट डिसेंबर महिन्यापूर्वी म्हणजेच ऊस पाच ते सहा महिन्याचा झाल्यानंतर मोठ्या भरणीनंतर काढावे. आडसाली उसाचे पाचट डिसेंबरनंतर काढू नये कारण फेब्रुवारीपासून उन्हाळा सुरु झाल्यामुळे उन्हाच्या झळा आतमध्ये शिरतात त्यामुळे उसातील पाण्याचे बाष्पीभवन होते. त्यामुळे ऊस सुकल्यासारखा दिसतो. उस पाचट काढताना हिरवी पाने काढू नयेत, कारण ऊस पिकाला लागणारे अन्न या पानामध्ये तयार होते. त्यामुळे हिरव्या पानाचे क्षेत्रफळ जेवढे कमी होईल तेवढे उसाची अन्न तयार करण्याची प्रक्रिया कमी होते. त्यामुळे उसाची जाडी वाढत नाही

बियाणासाठी ठेवलेल्या उसाचे पाचट काढू नये. फुले २६५, १०००१, ८००५ या वाणाच्या उसाचा पाला किंवा पाचट काढू नये. फुले २६५ या उसाचे पाचट काढल्याने डोळे फुटतात. ८६०३२ या वाणाच्या आडसाली उसाचे पाचट काढणे फायदेशीर ठरते. काढलेले उसाचे पाचट हे सरीमध्ये चांगल्या पद्धतीने कुजले तर त्याचे खत चांगले होते.

उभ्या उसातील सरीमध्ये एकरी १०० कि.ग्रॅ. सिंगल सुपर फॉस्फेट व ५० कि.ग्रॅ. युरिया पाचटावर टाकल्याने पाचट लवकर कुजते. तसेच पाचट कुजवण्यासाठी पाणी दिल्यानंतर प्रतिएकरी १ लिटर द्रवरूप डिकंपोझिंग कल्चरची फवारणी करावी. उसाचे पाचट शक्यतो एकदाच काढावे.

# शेवगा शेती, वाढत्या मागणीमुळे शेंगांचे दर आकाशाला भिडले..!

सध्या शेवग्याच्या शेंगा आणि पानांची मागणी वाढत आहे, कारण याचे आरोग्यदायी फायदे लोकांपर्यंत पोहोचले आहेत. शेवग्याचा उपयोग केवळ आहारासाठीच नव्हे, तर औषधी गुणधर्मांसाठी देखील केला जातो. शेवगा शेतीतून कमी वेळात अधिक उत्पादन आणि चांगले आर्थिक लाभ मिळवण्याची संधी शेतकऱ्यांसाठी उपलब्ध आहे.



शेवग्याची बाजारपेठेत वाढती मागणी : शेवग्याच्या शेंगांची मागणी ढाबा, हॉटेल आणि घरोघरी मोठ्या प्रमाणात आहे. शेवगा हंडी, शेवगा फ्राय, आणि शेवग्याच्या पानांची भाजी यासारख्या पदार्थांची लोकप्रियता वाढत आहे. यामुळे शेवग्याच्या शेंगांचे दरही अधिक मिळू लागले आहेत. मात्र सध्या बाजारात शेवग्याची शेंगा दुर्मिळ झाल्यामुळे त्याच्या किमतीत वाढ झाली आहे.

शेवग्याच्या शेतीचे फायदे : कमी भांडवलात अधिक नफा, शेवगा पिकवण्यासाठी कमी खर्च लागतो, परंतु त्याच्या शेंगा आणि पानांना चांगला भाव मिळतो. झपाट्याने उत्पादन : शेवग्याचे झाड एकदा लावल्यावर लगेच उत्पादन देण्यास सुरुवात करते. हे झाड टिकाऊ असल्याने दीर्घकाळ उत्पन्न मिळते.

संपूर्ण झाड उपयोगी : शेंगा शिजवून किंवा भाजून खाल्ल्या जातात, तसेच हॉटेल्स आणि ढाब्यांमध्ये शेवग्याच्या पदार्थांना मागणी आहे. पाने ही औषधी आणि आरोग्यवर्धक.

फुले आणि मुळे औषधांमध्ये वापरली जातात.

आरोग्यदायी फायदे : शेवग्याच्या पानांत प्रोटीन, कॅल्शियम, फायबर, आणि विटामिन्स भरपूर प्रमाणात असतात. त्याचा उपयोग औषधनिर्मितीत होत असल्याने, पानांचेही चांगले दर मिळतात.

शेवगा लागवडीत लक्ष द्यायच्या गोष्टी : मोकळ्या आणि सुपीक जमिनीत शेवगा लागवड करा. कमी पाण्यातही शेवग्याचे उत्पादन चांगले होते, त्यामुळे कमी जलस्रोत असलेल्या भागातही ही शेती फायदेशीर ठरते. रासायनिक खतांऐवजी सेंद्रिय खतांचा वापर केल्यास उत्पादनाचा दर्जा सुधारतो.

भविष्यासाठी शेवग्याची शेती कशी फायदेशीर? शेवग्याच्या पानांचे पावडर, तेल आणि औषधांमध्ये उपयोग वाढल्यामुळे निर्यात व्यवसायासाठी संधी आहे. शेवग्याच्या झाडांमुळे शेतकऱ्यांना दीर्घकाळ आर्थिक स्थैर्य मिळते.

शेवगा उत्पादकांसाठी सल्ला : शेवग्याच्या शेंगांचे योग्य वेळी तोड करून बाजारात पाठवा. पानांपासून पूड बनवून स्थानिक व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये विक्री करा. सेंद्रिय शेतीत शेवग्याचा समावेश केल्यास शेतीच्या दर्जात सुधारणा होईल. शेवग्याची शेती ही शेतकऱ्यांसाठी आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरू शकते. त्याच्या शेंगा, पाने, आणि अन्य भागांना बाजारपेठेत मागणी आहे. कमी गुंतवणुकीत जास्त नफा देणाऱ्या शेवग्याच्या शेतीकडे शेतकऱ्यांनी लक्ष द्यावे, यामुळे शेतीचे उत्पन्न निश्चितच वाढू शकते.

# महायुतीतील तिढा तातडीने सोडवा; तिन्ही पक्षांनी एकमेकांचा सन्मान ठेवा : पाटील

जालना। प्रतिनिधी

जालना महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीत सहभागी असलेल्या तिन्ही पक्षांनी परस्पर सन्मान राखून जागावाटपाचा तिढा लवकरात लवकर सोडवावा, असे स्पष्ट व ठाम आवाहन राज्याचे सहकार मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार गट)चे ज्येष्ठ नेते बाबासाहेब पाटील यांनी केले. ते जालना जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आयोजित महापालिका इच्छुक उमेदवारांच्या बैठकीत बोलत होते. शनिवारी जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालयात ही बैठक पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण होते. यावेळी मराठवाड्याचे समन्वयक आमदार विक्रम काळे, माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया, प्रदेश उपाध्यक्ष मधुकरराव आर्दड, प्रदेश सरचिटणीस शकुंतला ताई कदम, तसेच पक्षाचे अनेक वरिष्ठ पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली शिवशाहूफुलेआंबेडकर यांच्या विचारांची शिदोरी घेऊन राज्यभर वाटचाल करीत आहे. समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळवून देण्यासाठी पक्षाचे कार्यकर्ते सातत्याने कार्यरत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या निकालाकडे पाहिले असता मराठवाड्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष दुसऱ्या क्रमांकावर असल्याचे स्पष्ट दिसते. त्यामुळे महापालिका निवडणुकीत यश मिळवण्यासाठी कार्यकर्त्यांनी पूर्ण ताकद लावावी, असे आवाहन त्यांनी केले. महायुतीबाबत बोलताना श्री. पाटील यांनी स्पष्ट इशारा दिला की, जर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सन्मानजनक जागा मिळाल्या नाहीत, तर पक्षाला स्वबळावर निवडणूक लढवण्याचा विचार करावा लागेल. यावेळी आमदार विक्रम काळे यांनीही भूमिका स्पष्ट करत सांगितले की, राष्ट्रवादी काँग्रेसची महापालिका निवडणूक महायुतीतच लढण्याची इच्छा आहे. जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण यांनी सुरुवातीपासून हीच भूमिका घेतली आहे. मात्र, जर महायुती झाली नाही, तर पक्षाला पर्यायी निर्णय घ्यावा लागेल, असे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात माजी आमदार अरविंदराव चव्हाण म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेसने महापालिकेच्या सर्व ६५ जागांसाठी तयारी पूर्ण केली आहे. ही निवडणूक महायुतीत व्हावी, यासाठी सुरुवातीपासून प्रयत्न सुरू आहेत. तिन्ही पक्षांच्या नेत्यांच्या बैठका सकारात्मक वातावरणात झाल्या असून, शनिवारी होणाऱ्या अंतिम बैठकीत निश्चितच सकारात्मक निर्णय होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमात प्रदेश उपाध्यक्ष मधुकरराव आर्दड यांनी कार्यकर्त्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करत निवडणुकीसाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक शहर जिल्हाध्यक्ष शेख महेमूद यांनी केले. या वेळी सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते शिवराज जाधव यांची जालना शहर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) शहर ब्लॉक अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. तसेच प्रवीण शिंदे यांनाही नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. कार्यक्रमास बबन गाडेकर, दिलीप चव्हाण, प्रताप शिंदे, प्रभाकर घेवंदे, सतीश वाहुळे, शीतल बारोटे, विजय सोनवणे, तौफिक, शेख फारुख, जावेद अली, संतोष निकाळजे, भीमा छडीदार यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. सूत्रसंचालन शहर जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. सोपानराव तेलगड यांनी केले. या बैठकीमुळे महायुतीच्या चर्चांना वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, येत्या काळात राजकीय चित्र अधिक स्पष्ट होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

## बनावट लर्निंग ड्रायव्हींग लायसन्स देणाऱ्या आरोपीला पकडले

जालना। प्रतिनिधी

अभीजित कडुबा बावस्कर, सहायक मोटार वाहन निरीक्षक, यांच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपीतांनी एक बनावट वेबसाईट बनवुन सरकारी संगणक प्रणालीमध्ये अनाधिकृतपणे प्रवेश करुन सरकारी प्रक्रियेचा दुरुपयोग करुन नागरीकांकडुन आर्थिक फायदयाच्या दृष्टीने बनावट लर्निंग ड्रायव्हींग लायसन्स मिळवुन दिले यावरुन सायबर पोलीस ठाण्यात गु.र.नं.२३/२०२५ कलम ३१८(४), ३३६(२) (३), ३४०(२) भा.न्यां.सं. सह ४३ (१), ६६(),७२, ७२ आय.टी. ॲक्टसह कलम ३,४,७ मोटार वाहन अधिनियम सह नियम ११ केंद्रीय मोटार वाहन कायदा अन्वये अज्ञात आरोपीतांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता . सदर गुन्हयाच्या आरोपी निष्पन्न झाल्यानंतर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन आरोपींचा तपास लावण्यासाठी सायबर पोलीस ठाणे, यांनी पथक तयार करुन गुन्हातील आरोपी शोध घे २३/१२/२०२५ रोजी रवाना झाले. गुन्हयातील आरोपी बिट्टूराज प्रमोद यादव, वय-२४ वर्ष, हा त्याचे अस्तित्व लपवत असल्याने व राहण्याचे ठिकाण वारंवार बदलत असल्याने त्याचा शोध घेण्यास अडचणी निर्माण होत होत्या. त्यानुषंगाने पथकाने आरोपीताचा पटना शहर, सिमरी



बख्तियारपुर व टेहेंगर जि. सहरसा राज्य बिहार येथे स्थानिक पातळीवर जावुन मा. पोलीस अधीक्षक सहरसा श्री. हिमांशु सर व सायबर पोलीस ठाणे पोलीस उप अधीक्षक श्री. अजित कुमार यांच्या पथकासह आरोपीताचा शोध घेवुन त्यास ताब्यात घेतले व त्याच्या ताब्यातुन गुन्हा करण्यासाठी वापरलेला लॅपटाप, आयफोन, थम्ब मशिन असा रु.१,४६,०००/- किंमतीचा मुददेमाल जप्त केला. गुन्हयातील अटक आरोपीतास दिनांक २८/१२/२०२५ रोजी मा. न्यायालयात हजर केले असता आरोपीतास ०४ दिवस पोलीस कोठडी मिळाली आहे. सदर गुन्हयामध्ये यापुर्वी जम्मू कश्मीर येथुन आरोपी फैसल बशीर मीर, वय-२४ वर्ष, रा.ब्रामरी ड्रगमुल्ला, कुपवाडा, राज्य जम्मू कश्मीर व जालना येथील आरोपी मुजाहिद ऊर्फ डॉन रईसोद्दीन अन्सारी, वय-३२ वर्ष, रा.नादी यांना सायबर विभागाच्या पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, सहरसा जिल्हयाचे मा. पोलीस अधीक्षक श्री. हिमांशु, सायबर पोलीस ठाण्याचे मा. पोलीस उप अधीक्षक श्री. अजित कुमार, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. गुणाजी शिंदे, पोउपनि. पोउपनि. योगेश चव्हाण, येणे कारवाई केली आहे

## गुणवंत कामगारांचा स्नेहमेळावा उत्साहात!

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

सिडको एन-७ मधील त्रिदेवता मंदिराच्या सभागृहात शुक्रवारी गुणवंत कामगारांचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न झाला. सिडको पोलिस ठाण्याचे निरीक्षक अतुल येरमे, सामाजिक कार्यकर्ते राहुल मोरे, त्रिदेवता मंदिर विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष विश्वनाथ स्वामी व गुणवंत कामगार राजुकमार मुंबरे यांच्या हस्ते दी प्रज्वलित करुन मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. भारत मातेच्या प्रतिमेचे पूजनही यावेळी करण्यात आले. शाहीर भीमसिंग शिरे यांनी ' झाडे लावा झाडे जगवा' हे गीत गाऊन पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. निर्मला बडवे, सौ कल्पना अजमेरा आदींनी सुरेल गाणी गाऊन वातावरण निर्मिती केली. त्यांना भांबर्डे



महाराज, अरविंद अवचरमल आदींनी साथसंगत केली. व्यंगचित्रकार गौतम बारस्कर यांनी बोर्ड इंग्रजी चित्र काढून सर्वांची मने जिंकली. उद्घाटनपर भाषणात अतुल येरमे हे भावुक झाले. महिला भगिनींचा आगामी संक्रांतीचा सण गोड व्हावा म्हणून त्यांना साडी भेट तर पुरुषांना विठ्ठल रुक्मिणीची प्रतिमा भेट देण्यात आली. तसेच घाना विद्यापीठाची पीएच. डी पदवी प्राप्त केल्याबद्दल ॲड.नवाब पटेल, यंदाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल उत्तम आसबे यांच्यासह अनेक गुणवंतांचा यावेळी पाहुण्यांच्या हस्ते शाल, गुलाबाचे झाड व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.तसेच गुणवंत कामगारांचे जानेवारी महिन्यातील वाढदिवसही साजरे करण्यात आले. प्रारंभी, मराठवाडा गुणवंत कामगार विकास संस्थेचे अध्यक्ष स, सो, खंडाळकर व सचिव मुकुंद कोकणे यांनी प्रास्ताविक केले.राजेंद्र अजमेरा यांनी सूत्रसंचालन केले तर सहसचिव संतोष पापडीवाल यांनी आभार मानले. सुधाकर मांडोळे, महेश सेवलीकर, अभिजित थोरात, सुरेश वाकडे, गुलाब मगर, सुरेश टाक, मोहन हिंपळनेरकर, सुभाष देवकर, दत्तात्रय ठुबे पाटील आदींसह नियोजन समितीने या स्नेह मेळाव्याच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

## संजीवनी हॉस्पिटलमध्ये बारा वर्षाच्या मुलाला जीवनदान मिळाले

जालना। प्रतिनिधी

पतंग उडवण्याच्या नादात १२ वर्षाचा चिमुकला तोल जाऊन दुसऱ्या मजल्यावरून खाली पडल्यामुळे गंभीर जखमी झाला होता. अगदी बेशुध्द अवस्थेत त्याच्या पालकांनी त्याला जालना येथील संजीवनी मल्टीस्पेशलिटी हॉस्पीटलमध्ये दाखल केले. वैद्यकीय पथकाने तपासणी केल्यानंतर अनेक गुंतागुंती समोर. आल्या. त्या मुलाच्या डोक्याला जबर मार लागल्यामुळे मेंदूमध्ये रक्तस्त्राव झाला होता. त्याला धड श्वासही घेता येत नव्हता अशाही अवस्थेत संजीवनी हॉस्पीटलचे संचालक डॉ. बळीराम बागल यांनी वेळ न दवडता अत्यंत शर्तीचे प्रयत्न करून या मुलाला मृत्यूच्या दाढेतून बाहेर काढले. डॉ. अतुल काळे यांनी



यशस्वीरित्या शस्त्रक्रिया केली. यावेळी डॉ. कैलास राजगुरू, डॉ. शिवदास मिरकड यांचीही मोलाची मदत लाभली. डॉक्टरांची मेहनत, अचुक उपचार आणि आई-वडीलांच्या प्रार्थनेमुळे १७दिवसाच्या आत हा मुलगा बोलू लागला आणि चालुही लागला.

मृत्यूच्या दाढेतून जीवनाकडे एका १२ वर्षांच्या चिमुकल्याची प्रेरणादायी झुंज मिळाली. डोक्याला जबर मार बसला मुलगा बेशुद्ध पडला श्वासही नीट चालू नव्हता तात्काळ त्याला व्हेंटिलेटरवर ठेवावे लागले.

अशा अत्यंत गंभीर अवस्थेत रुग्णाला संजिवनी हॉस्पिटलमध्ये तत्काळ केल्यानंतर धक्कादायक सत्य समोर आले मेंदूमध्ये प्रचंड प्रमाणात रक्तस्राव तत्काळ आवश्यक वेळ न दवडता, डॉ. बळीराम बागल यांच्या मार्गदर्शनाखाली क्षणार्धात एक अनुभवी टीम तयार करण्यात आली. अत्यंत गुंतागुंतीची अशी मेंदूची शस्त्रक्रिया न्यूरोसर्जन डॉ. अतुल केशवराव काळे यांनी यशस्वीरित्या पूर्ण केली. या चिमुकल्याच्या नाजूक जीवासाठी लढताना पेडियाट्रिक मॅनेजमेंट डॉ. कैलास राजगुरू डॉ. शिवदास मिरकड यांनी अतिशय कुशलतेने हाताळले. शस्त्रक्रियेनंतर रुग्ण २३ दिवस व्हेंटिलेटरवर होता. परिस्थिती लक्षात घेऊन ट्रॅकिओस्टोमी करावी लागली. पण डॉक्टरांची मेहनत, अचूक उपचार आणि आई-वडिलांच्या प्रार्थना फळाला आल्या हळूहळू चिमुकल्याची प्रकृती सुधारू लागली दिवसांच्या आत तो पुन्हा बोलू लागला चालू लागला आणि आयुष्य पुन्हा पूर्वपदावर येऊ लागले आज तो चिमुकला नव्या आशेने आणि हसऱ्या चेहऱ्याने जीवनाकडे पाहतो आहे. संजिवनी मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटल, जालना जिथे वेळेवर निर्णय, अनुभवी डॉक्टर आणि टीमवर्क अशक्य वाटणाऱ्या प्रसंगांनाही आशेचे रूप देतात कारण येथे केवळ उपचार नाही, तर जीव वाचवले जातात. अशी प्रतिक्रिया रुग्णालयाच्या नातेवाईकांनी दिल्या

## वाळू माफयांनी अतिरेकपणा करू नये नसता गंभीर गुन्हे दाखल करण्यात येतील-विजय चव्हाण

अंबड। प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील चांभारवाडी येथील दुधना नदीपात्रातून सुरू असलेल्या अवैध वाळू उपशावर महसूल विभागाने मोठी कारवाई केली आहे. दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी केलेल्या या कारवाईत एक ट्रॅक्टर, गुन्ह्यात वापरलेली दुचाकी आणि तीन मोबाईल जप्त करण्यात आले असून, महसूल पथकाची रेकी (पाळत) करणाऱ्यांचा पर्दाफाश करण्यात आला आहे. ही कारवाई जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल ,अप्पर जिल्हाधिकारी श्री. रमेश मिसाळ ,उपविभागीय दंडाधिकारी श्री. उमाकांत पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून प्रशासनाने वाळू माफियांविरोधात उघडलेली मोहीम यापुढेही अशीच सुरू राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

नेमकी घटना काय? : मागील काही दिवसांपासून चांभारवाडी (ता. अंबड) येथून अवैध वाळू उपसा होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या अनुषंगाने ग्राम महसूल अधिकारी स्वप्निल खरात, महसूल सहाय्यक श्याम विभुते आणि महसूल सेवक विकास डोळसे यांचे पथक मौजे चांभारवाडी येथे गेले होते. पथक कारवाईसाठी जात असतानाच वाळू



तस्करांचे साथीदार करण गणेश शिंदे व सनी हिवाळे हे महसूल पथकाचे 'लोकेशन' घेण्यासाठी दुचाकीवरून त्यांचा पाठलाग करत असल्याचे लक्षात आले. याच दरम्यान, ऋषी गणेश शिंदे याने त्याच्या मामाच्या मुलाचे ट्रॅक्टर वापरून विनापरवाना १ ब्रास वाळू वाहतूक केली होती. महसूल पथक येत असल्याची चाहूल लागताच त्याने मौजे आलमगाव येथे वाळू खाली केली आणि ट्रॅक्टर आलमगाव रोडवर आणून उभे केले. तहसीलदारांची एन्ट्री आणि पुरावे परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पथकाने तात्काळ तहसीलदार विजय चव्हाण यांना संपर्क साधला. त्यानंतर तहसीलदार विजय चव्हाण आणि अव्वल कारकून रमेश वालेकर हे तातडीने घटनास्थळी दाखल झाले. संयुक्त पथकाने ट्रॅक्टरची बारकाईने पाहणी केली असता, ट्रॉलीला वाळू चिटकलेली आढळून आली. मोबाईलमध्ये दडले आहे मोठे रॅकेट या कारवाईत ऋषी गणेश शिंदे, करण गणेश शिंदे व सनी हिवाळे यांचे तीन मोबाईल जप्त करण्यात आले आहेत. या मोबाईलच्या तपासणीत धक्कादायक माहिती समोर आली आहे: मोबाईलमध्ये महसूल पथकाचे लोकेशन शेअर केल्याचे पुरावे. वाळूच्या ऑर्डर्स, वाहतूक आणि उत्खननाचे कॉल रेकॉर्डिंग, फोटो आणि व्हिडिओ. यावरून हे रॅकेट गेल्या अनेक दिवसांपासून सक्रीय असून यात अनेक लोकांचा सहभाग असल्याचे स्पष्ट झाले आहे. तपासादरम्यान रोहित संजय जगताप (रा. घोटण) हा व्यक्ती जेसीबीद्वारे वाळू उत्खननासाठी मदत करत असल्याचेही निष्पन्न झाले आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन व पुढील दिशा सदरची कारवाई जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल , अप्पर जिल्हाधिकारी श्री. रमेश मिसाळ , उपविभागीय अधिकारी श्री. उमाकांत पारधी यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली करण्यात आली. वरिष्ठ पातळीवरून अवैध गौण खनिजाबाबत 'झिरो टॉलरन्स' धोरण अवलंबण्यात आले असून, अशा प्रकारच्या सख्त कारवाया यापुढेही निरंतर सुरू राहणार आहेत.

जप्त मुद्देमाल व पथक: अवैध वाळू वाहतूक करणारे ट्रॅक्टर, रेकीसाठी वापरलेली दुचाकी आणि ३ मोबाईल जप्त करून अंबड तहसील कार्यालयात जमा करण्यात आले आहेत. तहसीलदार विजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली अव्वल कारकून रमेश वालेकर, ग्राम महसूल अधिकारी स्वप्निल खरात, महसूल सहाय्यक श्याम विभुते आणि महसूल सेवक विकास डोळसे यांनी ही कामगिरी बजावली.

## चोऱ्या थांबण्यासाठी वडीरामसगांव गावात सीसीटीव्ही कॅमेरे



घनसावंगी। प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय वडील रामसगाव येथे इथे या गावात चोरट्यांना आळा घालण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसण्यात आली सदरील सीसीटीव्ही कॅमेऱ्याची उद्घाटन तीर्थपुरी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक श्रीमती पठाडे मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच यावेळी ग्रामपंचायतच्या वतीने पोलीस उपनिरीक्षक श्रीमती पठाडे मॅडम यांचा सत्कार करण्यात आला. दिनांक २६ डिसेंबर रोजी विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले त्यावेळी ग्रामसभेचे अध्यक्ष श्री दत्तात्रेय कुंडलीक वराडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले . सदर ग्रामसभेसाठी पीटीओ श्री वैभव हर्षे विशेष उपस्थित होते. सदर ग्रामसभेत विकसित भारत जी रामजी अधिनियम २०२५ संदर्भात ग्रामपंचायत अधिकारी श्री के टी सोनमाळी यांनी अधिनियमातील ततुदींचे सविस्तर वाचन केले याप्रसंगी ग्राम रोजगार सेवक विलास जाधव ग्रामपंचायत माजी सरपंच महादेव जाधव ग्रामपंचायत ऑपरेटर मारुती सावंत ग्रामपंचायत कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

त्यानंतर ग्रामपंचायतीने लोक वर्गणीतून गावात बसवलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे तीर्थपुरी पोलीस ठाण्याचे पी एस आय श्रीमती पठाडे मॅडम यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले याप्रसंगी ग्रामपंचायतचे सरपंच उपसरपंच सर्व सदस्य व गावकरी मोठ्या संख्येने हजर होते. गावात ग्रामपंचायती मार्फत लोक वर्गणी जमा करून रुपये २४००० किमतीचे चार सीसीटीव्ही बसवण्यात आले आहे त्यामुळे गावात अवैधरित्या चालणाऱ्या धंद्यांना आळा बसेल. याबाबत ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

# डॉ.संदीप गाडे समर्पित आरोग्यसेवेचे उत्तम उदाहरण-पालकमंत्री विखे पाटील

## रुग्णसेवेची तळमळ पाहता डॉ.गाडे एक दिवस नीतू मांडगे होतील -आ.सुरेश धस

**डॉ.संदीप गाडे यांच्या इंम्पल्स हॉस्पिटलचा लोकार्पण सोहळा उत्साहात**

**आष्टी/नगर । प्रतिनिधी**

वैद्यकीय क्षेत्रामध्ये अत्यंत समर्पित भावनेने काम करणारे डॉ. संदीप गाडे व त्यांच्या सहकार्यांने इंम्पल्स हॉस्पिटलच्या रूपाने एक आरोग्य भवनच उभे केले आहे. या हॉस्पिटल मधून रुग्णांना सर्व प्रकारची रुग्णसेवा मिळणार आहे. त्याचबरोबर सर्व शासकीय योजनांचाही लाभ होणार आहे. सुपर स्पेशालिटी इंम्पल्स हॉस्पिटल म्हणजे अहिल्यानगर जिल्ह्याची भूषणवाह वास्तू आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

सुपर स्पेशलिटी इंम्पल्स हॉस्पिटलचे उद्घाटन जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, महाराष्ट्र राज्याचे विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, माजी महसूलमंत्री आमदार सुरेश धस, आमदार संग्राम जगताप,भगवान बाबा गडाचे महंत हभप नामदेव शास्त्री महाराज, मदन महाराज संस्थानचे महंत हभप बबन महाराज बहिरवाल यांच्या हस्ते झाले. यावेळी माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार साहेबराव दरेकर, माजी आमदार बाळासाहेब आजबे, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, आयुक्त यशवंत डांगे, माजी कृषी आयुक्त चव्हाण, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे, माजी नगरसेवक कुमारसिंह वाकळे, इंम्पल्स हॉस्पिटलचे संचालक डॉ. संदीप गाडे, डॉ. ज्योती गाडे, डॉ. संदीप गाडे यांचे वडील नवनाथ गाडे, आई फुलाबाई गाडे, डॉ. ज्योती गाडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, आज मन की बात कार्यक्रमांमध्ये सुद्धा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कुठली औषधी घेऊ,




नये असा विषय मांडला. सध्या मोठ्या प्रमाणावर आजारांची संख्या झाली आहे दैनंदिन जीवनामध्ये आहारामधून मानवाच्या शरीरामध्ये बरेचसे केमिकल जात आहे त्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कुठलेही औषध घेऊ नये असा सल्ला मन की बात मध्ये पंतप्रधान मोदीजींनी आज दिला.इंम्पल्स हॉस्पिटलचे उद्घाटन आणि पंतप्रधानांनी मन की बात कार्यक्रमांमध्ये आरोग्याचा विषयक मांडणे हा योगायोगच म्हणावा लागेल.

आमदार सुरेश धस यांनी एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला. त्यासंदर्भात लगेच तात्काळ सूचना देऊन बैठक लावण्यात येईल आणि संबंधित हॉस्पिटलला सूचना देण्यात येतील.

**रुग्णसेवेची क्रांती म्हणजे इंम्पल्स हॉस्पिटल**

सभापती प्रा. राम शिंदे म्हणाले की, इंम्पल्स हॉस्पिटलच्या निर्मिती मागे डॉ. संदीप गाडे यांचे अपार कष्ट आणि मेहनत आहे. हॉस्पिटलच्या निर्मितीसाठी अनेक रुग्णांची सकारात्मक आशीर्वाद त्यांना लाभले. डॉ. संदीप गाडे भविष्यातील डॉ. नीतू मांडके यांच्या प्रमाणे हृदयी रोगामध्ये स्पेशलिस्ट होऊ शकतात

आमदार सुरेश धस म्हणाले की, डॉ. संदीप गाडे यांची परिस्थिती पाहिली तर वडील शिक्षक व आई गृहिणी आहे. अतिशय सामान्य कुटुंबांमधून खडतर प्रवास करीत गाडे सरांनी त्यांच्या मुलांना शिक्षण दिले. आज या यश शिखरापर्यंत आणून पोहोचविले. या गोष्टीचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. आम्ही जरी बीड जिल्ह्यातील असलो तरीही अहिल्यानगर जिल्ह्याशी आमचा जवळचा स्नेह आहे.

पद्मश्री पोपटराव पवार म्हणाले की, इंम्पल्स हॉस्पिटलच्या रूपाने डॉ. संदीप गाडे यांनी आरोग्याची अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून दिली आहे. पूर्वी नगरकरांना आरोग्यासाठी पुण्याच्या दिशेने जावे लागत होते. परंतु, आता पुण्या इतकीच दर्जेदार आरोग्य सुविधा नगरमध्ये मिळणार आहे. डॉ. संदीप गाडे यांनी सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलच्या माध्यमातून आरोग्य सेवा आपल्यासाठी उपलब्ध करून दिली आहे.प्रास्ताविक करताना डॉ. संदीप गाडे म्हणाले की, हॉस्पिटलच्या उभारणीसाठी कुटुंबीयांसह सहकारी मित्र परिवाराने मोलाचे योगदान दिले. गेल्या बारा वर्षांमध्ये १६ हजार हृदयाच्या शस्त्रक्रिया केल्या. समर्पित भावनेने रुग्णसेवा केली आणि त्यातूनच आज एक सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलची उभारणी करण्यात यश मिळाले. या यशामध्ये प्रत्येक हितचिंतकाचा वाटा आहे. पाहुण्यांचा परिचय डॉ. बाबा शिंदे यांनी करून दिला तर, शेवटी डॉ. महेश घुगे यांनी आभार मानले.

# निवडणूक लढवणार संस्था चालक, भुर्दंड कर्मचाऱ्यांच्या माथी

## एक महिन्याचा पगार द्या म्हणून कर्मचाऱ्यांना सक्ती

पाटोदा । प्रतिनिधी

आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीसाठी सर्वच पक्षाच्या इच्छुकांनी कंबर कसली असून काही संस्था चालक देखील जिल्हा परिषदेच्या निवडणूक रिंगणात उतरणार आहेत त्यातच एका संस्था चालकांनी मला निवडणूक लढवायची आहे खर्च मोठा होणार असल्याने संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांना एक महिन्याचा पगार द्यावा लागेल अशी शक्ती केली असल्याची चर्चा बीड आणि पाटोदा तालुक्यांमध्ये सुरू आहे.

जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीसाठी सर्वच पक्षांनी जोरदार तयारी सुरू केली आहे भाजपाने आत्तापासूनच इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती आणि अर्ज घेणे सुरू केले आहे अशातच बीड आणि पाटोदा या दोन्ही तालुक्यांमध्ये काही इच्छुक मोठ्या संख्येने गर्दी करत आहेत त्यामध्ये एका संस्था चालकाचा किस्सा काही कर्मचारी दबके आवाजाने सार्वजनिक ठिकाणी बोलत



आहेत विशेष म्हणजे हा संस्थाचालक आता जिल्हा परिषदेची निवडणूक लढवणार आहेत विशेष म्हणजे या संस्था चालकाच्या बीड पाटोदा, शिरूर कासार, गेवराई या ठिकाणी संस्था आहेत संस्थेचे मोठे जाळे असल्याने पाटोदा तालुक्यातील एका सर्कल मधून निवडणूक लढवण्याची इच्छा गेल्या अनेक वर्षापासून हे संस्था चालक करत असल्याची चर्चा सर्वत्र आहे निवडणुका सध्या सोप्या नाहीत त्यासाठी जनसंपर्क बरोबरच आर्थिक कणा मजबूत आणि मोठा असणे गरजेचे आहे त्यामुळे या संस्था चालकाने निवडणुकीतील खर्च भागवण्यासाठी संस्थेतील कर्मचाऱ्यांना सक्ती केली असल्याची समजते विशेष म्हणजे सर्वच कर्मचाऱ्यांनी एक महिन्याचा पगार द्यावा असेही संस्था चालकाने कर्मचाऱ्यांना सांगितल्याचे बोलले जात आहे कशासाठी एक महिन्याचा पगार देणे म्हणजे घर खर्च तरी कसा भागवायचा अशी चिंता आता त्या कर्मचाऱ्यांना पडले आहेत परंतु काही असले तरी नोकरी करायची म्हटल्यावर संस्था चालक सांगतील त्या पद्धतीनेच कर्मचाऱ्यांना वागावे लागेल मात्र हा संस्थाचालक कर्मचाऱ्याकडूनच वसुली करत असल्याची मोठी चर्चा आहे

# डॉ.सारिकाताई क्षीरसागर बीडमध्ये फिल्डवर

## प्रभागातील स्वच्छतेसह इतर कामांना प्रत्यक्ष सुरुवात

बीड । प्रतिनिधी

शहरातील प्रभाग १५ मधील स्वच्छता व इतर कामांना प्रत्यक्षात सुरुवात करण्यात आली आहे. भाजपच्या नगरसेविका तथा गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर ह्या शहरात फिल्डवर दिसून आल्या. त्यांनी इतरही सहकारी नगरसेवकांना कामाला लावले आहे.

डॉ.सारिकाताई क्षीरसागर म्हणाल्या, प्रभागातील नागरिकांनी दिलेला विश्वास हेच आपले कवचकुंडल असून, त्या



विश्वासाच्या बळावर प्रभागाच्या विकासासाठी सातत्याने काम केले जाईल. यासोबतच बीड शहराच्या सर्वांगीण ◀◀ पान ३ वर

# संत वामनभाऊ ५० वा पुण्यतिथी सोहळा तोंडावर; गहिनीनाथ गडाकडे जाणारा रस्ता मात्र खड्डेमय

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा-चिचोली येथील श्री क्षेत्र गहिनीनाथ गडावर संत वामनभाऊ महाराजांचा ५० वा पुण्यतिथी सोहळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. हा सोहळा राज्यभरातील लाखो भाविकांसाठी श्रद्धेचा आणि भक्तीचा महत्त्वाचा कार्यक्रम मानला जातो. यंदा या सोहळ्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री उपस्थित राहणार असल्याने कार्यक्रमाकडे सर्वांचे



लक्ष लागले आहे.

मात्र एवढ्या मोठ्या व प्रतिष्ठेच्या धार्मिक कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर गहिनीनाथ गडाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याची अवस्था अत्यंत ◀◀ पान ३ वर

# अराजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षेसाठी उमेदवारांना वयोमर्यादेत एक वर्षाची सवलत द्या-धनंजय मुंडे

मुंबई । प्रतिनिधी

अराजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा - २०२५ अंतर्गत प्रसिद्ध करण्यात आलेली जाहिरात ७ महिने उशिरा अर्थात जुलै २०२५ मध्ये प्रसिद्ध करण्यात आली असून, त्यानंतर उमेदवारांना वयोमर्यादा निश्चितीसाठी १ नोव्हेंबर, २०२५ ही तारीख निश्चित केल्याने अनेक उमेदवार या परीक्षेत वयोमर्यादा ओलांडल्याने अपात्र होतील, त्यामुळे या परीक्षेसाठी इच्छुक उमेदवारांना वयोमर्यादेत एक



वर्षाची सवलत द्यावी किंवा त्यानुसार वयोमर्यादा निश्चितीची तारीख बदलण्यात यावी, अशी विनंती माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे केली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या अराजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ अंतर्गत पोलिस उपनिरीक्षक पदाच्या परीक्षेसाठी दि. २९ जुलै, २०२५ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून त्यासाठी परीक्षार्थींची वयोमर्यादा ग्राह्य धरण्यासाठी दि. ०१ नोव्हेंबर, २०२५ ही तारीख निश्चित करण्यात आली आहे. सदर जाहिरात नियमित प्रघाताप्रमाणे अपेक्षित वेळेच्या ७ महिने उशिरा प्रसिद्ध झाली असून, वयोमर्यादा ग्राह्य धरण्यास दिलेल्या तारखेमुळे सदर परीक्षेस अनेक परीक्षार्थी वयोमर्यादा ओलांडल्याने अपात्र ठरत आहेत. यापूर्वी मागील वर्षी अशाच ◀◀ पान ३ वर

# रामकवरबाई खेत्री यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील रामकवरबाई लक्ष्मण खेत्री यांचे दि.२८ डिसेंबर रविवार रोजी पहाटे ५:०० वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ६५ वर्ष होते. त्यांच्या पार्थिवावर दि.२८ डिसेंबर रविवार रोजी दुपारी १२:०० वाजता मोठेवाडी येथील स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात पती,चार मुली,एक मुलगा,सुना,नातवंडे असा परिवार आहे.प्राचार्य भरत खेत्री यांच्या त्या आई होत.

# गेवराई तालुक्यातील सर्व सर्कलमध्ये भाजपचाच झेंडा फडकणार -बदामराव पंडित

## यापुढे बीडच्या पंडितांना गुलाल लागणार नाही -बाळराजे पवार; बदामराव पंडित व बाळराजेंमुळे भाजपाच जिंकणार -देशमुख

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई विधानसभा मतदारसंघातील जनता हुकुमशाही आणि झुंडशाहीच्या विरोधात एकवटली असून, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत यावेळी सर्व जागांवर भाजपचाच झेंडा फडकेल असा विश्वास व्यक्त करून उमेदवारी मिळाली नाही तर विनाकारण केवळ उमेदवारीसाठी इकडे तिकडे जाऊन चूक करू नका असे आवाहन माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केले. तर यापुढे बीडच्या अमरसिंह पंडित व विजयसिंह पंडितांना गुलाल लागणार



नाही असे बाळराजे पवार म्हणाले. बदामराव पंडित आणि बाळराजे पवार या दोन शक्ती भक्तीच्या जोडीमुळे गेवराई तालुक्यातील सर्वच जागांवर भाजपचाच विजय होईल असा विश्वास जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांनी व्यक्त केला. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी भाजपकडून इच्छुकांच्या मुलाखती वेळी इच्छुक उमेदवारांची तोबा गर्दी झाल्याचे पाहायला मिळाले.

भारतीय जनता पार्टी कडून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी गेवराई विधानसभा मतदारसंघातील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतीसाठी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या निवासस्थानी दिनांक २८ डिसेंबर २०२५ रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी भाजपाने ते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित भाजपा नेते बाळराजे पवार जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख पक्ष निरीक्षक संजय आंधळे, माधव निर्मळ सतीश मुंडे विधानसभा समन्वयक श्रीकांत सानप आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना माजी राज्यमंत्री बदामराव पंडित म्हणाले की, गेल्या पंचवार्षिकला मी आणि लक्ष्मणराव पवार वेगवेगळे लढलो तरीही आमचेच सदस्य जास्त संख्येने निवडून आले. विरोधक असलेल्या अमरसिंह पंडित आणि विजयसिंह पंडित यांना तिसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले. विजयसिंह पंडित आमदार झाल्यानंतर तालुक्यात कोठेही ◀◀ पान ३ वर

# बापाच्या खुनाच्या आरोपातून मुलाची निर्दोष मुक्तता

माजलगाव । प्रतिनिधी

वडिलांच्या खुनाच्या गंभीर आरोपाखाली अडकलेल्या मुलाची अखेर न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. संतोष शाहु शिंदे (रा. तालखेड, ता. माजलगाव, जि. बीड) यांच्यावर वडील शाहु शिंदे यांच्या खुनाचा आरोप होता.मात्र सरकारी पक्ष संशयाच्या पलीकडे दोष सिद्ध करण्यात अपयशी ठरल्याने अतिरिक्त सत्र न्यायाधीश राजेश्री परदेशी मॅडम यांनी आरोपी संतोष शिंदे यांची निर्दोष मुक्तता केली.या प्रकरणी फिर्यादी राजुबाई शाहु शिंदे यांनी ०६ जून २०२२ रोजी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तक्रारीत मुलगा संतोष याने वडिलांच्या डोक्यात दगड व बकेट मारून खून केल्याचा आरोप करण्यात आला होता.त्यानुसार माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गु.र.नं. १३१/२०२२ अंतर्गत भा.दं.वि. कलम ३०२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. तपास पूर्ण करून आरोपीविरोधात दोषारोपपत्र न्यायालयात सादर करण्यात आले होते.



सदर प्रकरण सत्र न्यायालयात सेशन केस नं. ६१/२०२३ म्हणून चालविण्यात आले. सरकारी पक्षातर्फे एकूण सात साक्षीदार तपासण्यात आले. मात्र साक्षीदारांचे जबाब, वैद्यकीय पुरावे तसेच घटनास्थळ पंचनाम्यात गंभीर विसंगती आढळून आल्या. बचाव पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरत, आरोपीविरुद्ध ठोस व विश्वासार्ह पुराव्यांचा अभाव असल्याचे नमूद करत न्यायालयाने निर्दोष मुक्ततेचा आदेश दिला.या प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड. आनंद आबासाहेब देशमुख व ॲड. शुभांगी आनंद देशमुख यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. निकालानंतर संतोष शिंदे व त्यांच्या कुटुंबीयांनी सुटकेचा निश्वास सोडला.

# बाजीराव जगताप, मंगला सोळंके, पत्रकार सुधाकर देशमुख व शेख सत्तार यांना माजलगाव पत्रकार संघाचे पुरस्कार जाहिर

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव पत्रकार संघाच्या वतीने यंदाचा दर्पण पुरस्कार हा जेष्ठ पत्रकार सुधाकर बळीरामपंत देशमुख, माजलगाव भुषण पुरस्कार छत्रपती कारखान्याचे चेअरमन बाजीराव जगताप, समाज भुषण पुरस्कार माजलगाव विकास प्रतिष्ठाणच्या अध्यक्षा सौ. मंगला प्रकाश सोळंके यांना तर यशस्वी उद्योजक म्हणुन शहरातील प्रतिष्ठीत उद्योजक शेख सत्तार यांचा सन्मान करण्यात येणार आहे. दि. ६ जानेवारीला मान्यवरांच्या उपस्थितीत या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. माजलगाव पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षी दर्पण पुरस्कारासह विवीध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणा-यांचा विशेष गौरव करण्यात येतो. यावर्षीही विवीध पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार असुन जेष्ठ पत्रकार सुधाकर बळीरामपंत



देशमुख, माजलगाव भुषण पुरस्कार छत्रपती कारखान्याचे चेअरमन बाजीराव जगताप, समाज भुषण पुरस्कार व सन्मान नारीशक्तीचा या उपक्रमात माजलगाव विकास प्रतिष्ठाणच्या अध्यक्षा सौ. मंगलाताई प्रकाश सोळंके यांना तर यशस्वी उद्योजक म्हणुन शहरातील प्रतिष्ठीत उद्योजक शेख सत्तार यांचा सन्मान विवीध मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. दि. ६ जानेवारीला होणा-या दर्पण पुरस्कारासह विवीध पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थांनी जेष्ठ पत्रकार उमेश मोगरेकर हे तर खासदार बजरंग सोनवणे, आमदार प्रकाश सोळंके, आयुष्यमान भारतचे प्रमुख ओमप्रकाश शेटे, नगराध्यक्षा शिफा बिलाल चाउस, मा. आ. मोहनराव सोळंके, मा. आ. राधाकृष्ण होके पाटील, मा. आ. डि. के. देशमुख, बाबुराव पोटभरे, अशोक डक, प्रा. मिलींद आवाड, जयसिंग सोळंके, सभापती जयदत्त नरवडे, ◀◀ पान ३ वर

# आ. धस यांच्या प्रयत्नातून वाळुंज येथे ३ कोटी २९ लाखांची विकासकामे

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील वाळुंज येथे मराठवाडा भूषण, लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या विशेष प्रयत्नातून एकूण ३ कोटी २९ लाख रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचा भव्य शुभारंभ रविवार दि. २८ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता युवा नेते सागर धस यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

या अंतर्गत २ कोटी ५० लाख रुपये खर्चाची संरक्षण भिंत, जिल्हा वार्षिक नियोजन अंतर्गत २९ लाख रुपये, तसेच प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत ५० लाख



**सागर धस यांच्या शुभहस्ते भव्य शुभारंभ**

रुपये अशी एकूण ३ कोटी २९ लाख रुपयांची कामे मंजूर असून, त्याचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी बोलताना युवा नेते सागर धस म्हणाले की, ग्रामीण भागाचा विकास हा केवळ रस्ते व इमारतीपुरता मर्यादित नसून, नागरिकांच्या सुरक्षिततेला आणि रोजगारनिर्मितीला प्राधान्य देणे आवश्यक आहे. वाळुंज येथे उभारण्यात येणारी संरक्षण भिंत ही भविष्यातील संभाव्य आपत्तींपासून गावाचे संरक्षण करेल, तसेच हे काम अतिशय दर्जेदार होईल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.तसेच पर्यटन विकासाच्या माध्यमातून या पंचक्रोशीतील भाविकांचे आराध्य दैवत असलेले श्री भैरवनाथ मंदिराच्या सुशोभीकरण व यात्रा परिसराचा कायापालट होणार असून शासनाच्या विविध योजनांचा लाभ गावापर्यंत पोहोचवण्यासाठी मराठवाडा भूषण आ. सुरेश धस हे नेहमीच ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# विजयस्तंभ अभिवादन सोहळा शांततेत पार पाडा-डॉ. हर्षदीप कांबळे यांचे आवाहन

**लोणीकंद । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या स्वातंत्र्य, समता व बंधुतेच्या मूल्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून विजयस्तंभ अभिवादन सोहळा शांततेत व शिस्तबद्धरीत्या पार पाडणे ही आपली सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. यासाठी प्रशासन, सामाजिक संघटना आणि नागरिकांनी परस्पर समन्वय साधत प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी केले.

हवेली तालुक्यातील पेरणे फाटा येथील विजयस्तंभ परिसरास भेट देऊन १ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या विजयस्तंभ अभिवादन सोहळ्याच्या अनुषंगाने विविध विभागांकडून करण्यात येणाऱ्या पूर्वतयारीचा आढावा घेताना ते बोलत होते. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी)चे महासंचालक सुनील वारे,



समाजकल्याण आयुक्त दिपा मुधोळ-मुंडे, पोलीस अधीक्षक संदीप गिल, पुणे शहर पोलीस उपायुक्त सोमय मुंडे,

उत्पादक शुल्क अधीक्षक अतुल कानडे, समाजकल्याण विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता अनुराधा भंडारे, उपविभागीय अधिकारी यशवंत माने, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, गट विकास अधिकारी शेखर शेलार, बार्टीचे विभाग प्रमुख डॉ. बबन जोगदंड तसेच विजयस्तंभ स्मारक समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

डॉ. कांबळे म्हणाले की, देशभरातून लाखो अनुयायी १ जानेवारी रोजी विजयस्तंभास अभिवादनासाठी येतात. यंदा गेल्या वर्षीपेक्षा गर्दी वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने आवश्यक सोयी-सुविधांचे काटेकोर नियोजन करावे. येणाऱ्या अनुयायांना कोणतीही अडचण येणार नाही, याची खबरदारी घेत सर्व कामे नियोजित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

विविध विभागांकडून सादर करण्यात आलेल्या मागण्यांबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे प्राप्त प्रस्तावांना आजच मान्यता दिली जाईल, तसेच आणखी काही मागण्या असल्यास तातडीने प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विजयस्तंभास दिलेल्या भेटीस सन २०२७ मध्ये १०० वर्षे पूर्ण होत आहेत. या पार्श्वभूमीवर भविष्यात अनुयायांची वाढती संख्या लक्षात घेता दीर्घकालीन नियोजन आणि पायाभूत सुविधांची तयारी आतापासूनच करावी, असेही डॉ. कांबळे यांनी स्पष्ट केले.

**सर्वंकष पूर्वतयारीचा आढावा**

बैठकीत विविध विभागांकडून करण्यात येणाऱ्या पूर्वतयारीची माहिती देण्यात आली. यामध्ये विजयस्तंभ सजावट, रुग्णवाहिका, आरोग्य केंद्र व औषधसाठा, रुग्णालयांतील खाटांचे आरक्षण, स्वच्छता, पिण्याच्या पाण्याचे टँकर, घंटागाडी, हिरकणी कक्ष, बसेसचे नियोजन, विद्युत व्यवस्था, पुस्तक विक्री स्टॉल, शौचालये, वाहनतळ, रस्ते दुरुस्ती, कायदा व सुव्यवस्था, वाहतूक व्यवस्थापन, गर्दी नियंत्रण, पोलीस बंदोबस्त, सीसीटीव्ही,

आपत्कालीन प्रतिसाद, समाजमाध्यमांचे सनियंत्रण, नियंत्रण कक्ष तसेच बिबट व सर्प प्राणी व्यवस्थापन यांचा समावेश आहे. याठिकाणी सुरू असलेल्या पूर्वतयारीबाबत समाधान व्यक्त करत ही माहिती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच सामाजिक न्याय मंत्र्यांना कळविण्यात येईल, असेही डॉ. कांबळे यांनी सांगितले.

## गौतम अदानींच्या हस्ते होणार देशातील सर्वात मोठ्या 'एआय' केंद्राचं उद्घाटन



**बारामती । प्रतिनिधी**

देशातील सर्वात अत्याधुनिक व ग्रामीण जीवनाचा चेहरामोहरा बदलू शकणाऱ्या विद्या प्रतिष्ठानच्या शरदचंद्र पवार सेंटर ऑफ एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे उद्घाटन रविवारी (दि. २८) रोजी होत आहे. अदानी उद्योगसमूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांच्या हस्ते, ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुप्रिया सुळे,खासदार सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत सकाळी दहा वाजता गदिमा सभागृहात हे उदघाटन होणार आहे.

विद्या प्रतिष्ठाणचे उपाध्यक्ष अँड. ए. व्ही. प्रभुणे, खजिनदार युगेंद्र पवार, सचिव अँड. नीलिमा गुजर यांनी या बाबत माहिती दिली. बदलत्या काळाची पावले ओळखत आर्टिफिशियल इंटेलिजेन्सचे शिक्षण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावे या उद्देशाने शरद पवार यांच्या पुढाकारातून बारामतीत हे केंद्र सुरु होत आहे. या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये अत्याधुनिक एआय व डेटा सायन्स प्रयोगशाळा, प्रमाणपत्र व कौशल्यवर्धक अभ्यासक्रम, उद्योगतज्ज्ञांचे मार्गदर्शन, संशोधन व नवउद्योजकतेसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.शरदचंद्र पवार सेंटर ऑफ एक्सलन्स (-ख) हे केंद्र कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, डेटा सायन्स, व्यवसाय विश्लेषण व नवोन्मेष या आधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रात विद्यार्थ्यांना, संशोधकांना व उद्योगजगताला एकत्र आणणारे महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे.

# तुरुंगातून थेट निवडणूक रिंगणात! बंडू आंदेकरचा अर्ज, व्हिक्ट्री साईनने शक्तीप्रदर्शन

**पुणे । प्रतिनिधी**

आतापर्यंत उत्तर प्रदेश-बिहारमध्ये पाहायला मिळणारे चित्र आता शिक्षणाचं माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यातही दिसून आलं आहे. आयुष कोमकर हत्या प्रकरणातील आरोपी आणि आंदेकर टोळीचा म्होरक्या बंडू आंदेकर याने थेट तुरुंगातून महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करत लोकशाहीचाच बाजार मांडला. तोंडावर काळं कापड, पोलिसांच्या दोरखंडात जखडलेला आणि कडक बंदोबस्तात आणलेला बंडू आंदेकर भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालयात अर्ज भरताना व्हिक्ट्री साईन दाखवत शक्तीप्रदर्शन करताना दिसून आला.

'नेकी का काम, आंदेकर का नाम' अशा घोषणांसह त्याने अर्ज भरण्याची एन्ट्री घेतली आणि अर्ज दाखल करतानाच स्वतःच्या प्रचाराचा नारळ फोडला. शनिवारी पोलिस बंदोबस्तात भवानी पेठ कार्यालयात आणण्यात आलेल्या आंदेकरने, बघा,



बघा, मला लोकशाहीत कसं आणलंय. आंदेकरांना मत म्हणजे विकासकामांना मत. मी उमेदवार आहे, दरोडेखोर नाही. वनराज आंदेकर जिंदाबाद, अशा घोषणा देत वातावरण तापवलं. सध्या आयुष कोमकर हत्या प्रकरणात तुरुंगात असलेला बंडू आंदेकर पुण्यातील प्रभाग क्रमांक २३ मधून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवण्यात इच्छुक आहे.

महापालिका निवडणुकीसाठी आंदेकर कुटुंबातील तिघांना विशेष न्यायालयाने सशर्त परवानगी दिली आहे. बंडू आंदेकर, लक्ष्मी उदयकांत आंदेकर, सोनाली वनराज आंदेकर यांना परवानगी दिली गेली आहे. मात्र न्यायालयाने बंडू आंदेकरला मिरवणूक, भाषण आणि घोषणाबाजी करण्यास स्पष्ट मनाई केली होती. तरीही प्रत्यक्षात घोषणाबाजी आणि शक्तीप्रदर्शन पाहायला मिळाले. लक्ष्मी आंदेकर आणि सोनाली आंदेकर या दोघीही ५ कोटी ४० लाख रुपयांच्या खंडणी प्रकरणात सध्या कारागृहात आहेत. आंदेकर कुटुंबातील हे तिघेही प्रभाग क्रमांक २२, २३ आणि २४ मधून निवडणूक लढवण्यास इच्छुक असल्याची माहिती आहे. बंडू आंदेकरला खंडणीच्या गुन्ह्यात कारागृहातून गुन्हेशाखेने पोलीस कोठडीत घेतले आहे. तो सध्या गुन्हे शाखा युनिट एकच्या ताब्यात आहे. तर लक्ष्मी आणि सोनाली आंदेकर या कोल्हापूर कारागृहात आहेत. त्यांना तेथून सकाळी साडे नऊला पुणे शहरात आणण्यात आले. तीघांनाही साडे अकराच्या सुमारास क्षेत्रीय कार्यालयात आणण्यात आले. ते दुपारी तीन वाजता बाहेर पडले. तो पर्यंत परिसरात कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पोलीस उपायुक्त, सहायक आयुक्त, वरिष्ठ पोलीस निरीक्षक आणि गुन्हे शाखेची पथके तैनात करण्यात आली होती. परिसरात बॅरिकेटस लावून सर्वसामान्य नागरिकांना बंदी घालण्यात आली होती. यामुळे आंदेकर टोळीचे नंबरकारी तीकडे फिरकलेच नाहीत.

# बारामतीला आलेल्या गौतम अदानींचं अजित पवारांकडून तोंडभरुन कौतुक

**बारामती । प्रतिनिधी**

गौतम भाई नेहमीच बारामतीत येतात. पवार साहेबांना (डहरीरव झरुरी) दिवाळी शुभेच्छा द्यायला ते येतात. त्यांचे आज पुन्हा बारामतीत आगमन झाले त्यांचे तमाम बारामतीकरांकडून मी मनापासून स्वागत करतो. प्रत्येकाच्या आयुष्यात सुरुवात होते. लोकं मोठे झाल्यावर आरोप करतात, टीका-टिप्पणी करतात पण आपण आपलं काम करत राहायचं असतं. माझ्या माहितीप्रमाणे १९९०च्या दशकात हि एमआयडीसीची ४० एकर जागा घेतली आणि नक्षत्र उद्यानसह टप्प्याटप्प्यानं विकासकामे होत गेली. आज मानाचा तुरा त्यात रोवला गेलाय. ते 'शरद पवार सेंटर ऑफ एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स' या केंद्राचे उद्घाटन होय. ज्याची खऱ्या अर्थाने ग्रामीण भागातील तरुण तरुणांसाठी गरज होती. असं मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केले.

बारामतीमध्ये शरद पवार सेंटर ऑफ एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स सेंटरचे उद्घाटन उद्योगपती गौतम अदानी यांच्या हस्ते होत आहे. या कार्यक्रमाला मुख्य पाहुणे म्हणून गौतम अदानी हे उपस्थित आहेत. त्याचबरोबर शरद पवारांसह अजित पवार, सुनेत्रा पवार, सुप्रिया सुळे आणि युगेंद्र पवार हे देखील या कार्यक्रमाला उपस्थित आहेत. शिवाय सर्व पवार कुटुंब



या कार्यक्रमाच्या निमित्ताने एकत्र आलं आहे. याच कार्यक्रमात अजित पावर बोलत होते. त्यावेळी त्यांनी गौतम अदानींचं आणि अदानी समूहाचं तोंडभरुन कौतुक केले. बारामतीच्या दृष्टीनं आजचा दिवस अतिशय महत्वाचा आहे. बारामतीकरांनी सुरवातीच्या काळात पवार साहेबांना नेतृत्व करण्याची संधी दिली, त्यातून त्यांनी अनेक महत्वपूर्ण आणि विविध क्षेत्रात कार्य केलीत. पवार साहेबांचे व्हिजन होत त्याला अनेकांनी साथ दिली. सुरवातीचा काळ असा होता ज्याला लिहता वाचता येईल तो साक्षर आणि ज्याला ते येणार नाही तो निरक्षर. नंतर असा काळ आला ज्यामध्ये ज्याला संगणक येईल तो साक्षर समजलं जायचं. मात्र आताचा आणि येणार काळ असा आहे जो एआयचे शिक्षण घेईल तो साक्षर समजला जाईल, अशी शक्यता आहे. गौतम भाईंनी १९८८ साली शून्यातून व्यवसायाला सुरुवात केली. आपली संस्था १९७२ सालाची आहे. सुरुवातीपासून आजपर्यंत आपण एक रुपया डोनेशन घेतलं नाही. अदानी उद्योग समूह २० देशांत त्यांचे काम सुरू आहे. ३५ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तर ते ३ लाख लोकांना अडाणी संस्था रोजगार देत आहेत. पुढच्या पाच वर्षात हा आकडा ५ लाखावर जाईल. त्यामुळे एकाद्याचं व्हिजन असेल, काम करायची जिद्द असेल तर काय होऊ शकतं, हे अदानी उद्योग समूहाकडे बघून कळतं. असं म्हणत उपमुख्यमंत्री अजित पवारांनी अदानी समूह आणि गौतम अदानींचे कौतुक केलं आहे.

# पुण्यात शरद पवारांच्या राष्ट्रवादीचं तळ्यात मळ्यात! मविआच्या बैठकीला दांडी, स्थानिक नेते नॉट रिचेबल

**पुणे । प्रतिनिधी**

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुण्यात नाट्यमय घडामोडी घडत आहेत. सुरुवातीला या निवडणुकीसाठी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची चर्चा सुरु होती. मात्र, ही चर्चा फिस्कटल्याची माहिती समोर आली होती. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने महाविकास आघाडीतील पक्षांशी बोलणी सुरु होती. अशातच आज पुण्यात महाविकास आघाडीची बैठक आयोजीत केली होती. मात्र, या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते पोहोचले नसल्याची माहिती मिळाली आहे. त्यांचे स्थानिक नेते नॉट रिचेबल असल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळं पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट महाविकास आघाडीसोबत जाणार की नाही? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

पुण्यात महाविकास आघाडीची बैठक मात्र राष्ट्रवादीचे नेते पोहोचले नाहीच. पुण्यातील काँग्रेस भवन मध्ये काँग्रेस आणि ठाकरे गटाच्या नेत्यांची बैठक आयोजीत केली होती. मात्र राष्ट्रवादीच्या नेत्यांनी दांडी मारली आहे. जागावाटपावर केवळ दोन पक्षाच्या नेत्यांचीच चर्चा झाली आहे. राष्ट्रवादीचे सगळे स्थानिक नेते नॉट रिचेबल आहेत. राष्ट्रवादीच्या नेत्यांनी बैठकीला येणे टाळल्याने पुन्हा राजकारणाला नव वळण लागण्याची शक्यता आहे. त्यामुळं पुण्यात महाविकास आघाडीच आणखी काहीच ठरत नसल्याचे दिसत आहे. रविवार सकाळपासून आम्ही निवडणुकीच्या बैठकीसाठी बसलो आहोत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांना देखील निरोप दिले होते. दुपारी येणार



होते पण अजून त्यांचे नेते आले नाहीत. तरीही काल ज्या जागा त्यांना ठेवल्या आहेत त्या आजही तशाच आहेत अशी माहिती पुण काँग्रेसचे गटनेते अरविंद शिंदे यांनी दिली. आम्ही काल तिघे बसलो आज ते नाहीत का आले नाहीत हा त्यांचा प्रश्न आहे. आजही आम्ही त्यांची वाट पाहत आहोत. १६५ जागांची आमची यादी तयार आहे. आजही त्यांना ठेवलेल्या जागा तशाच आहेत. याद्या पूर्ण झाल्या आहेत असे शिंदे म्हणाले. मी त्यांच्या सगळ्या नेत्यांना कॉल केला त्यांचे नेते फोन उचलत नाहीत, काही नेते नॉटे रिचेबल आहेत ज्यांच्यावर जबाबदारी होती त्या सगळ्यांना फोन केल्याचे शिंदे म्हणाले. आम्ही आज रात्रीपर्यंत निर्णय घेत आहोत. आमचा प्लॅन बी देखील तयार असल्याचे शिंदे म्हणाले.

# शिक्षिकेला सुरक्षारक्षकांकडून मारहाण; सात जणांवर गुन्हा दाखल

**राजगुरुनगर । प्रतिनिधी**

भीमाशंकर (ता. खेड) येथील देवस्थान परिसरात सुरक्षा रक्षकांकडून एका शिक्षिकेसह त्यांच्या कुटुंबीयांना बेदम मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी खेड पोलीस ठाण्यात सात सुरक्षा रक्षकांसह एका अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याप्रकरणी माया हंबीर लंघे (वय ४८, रा. चंदननगर, पुणे) यांनी खेड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, २४ डिसेंबर रोजी दुपारी १.३० ते २ वाजण्याच्या सुमारास भीमाशंकर देवस्थानातील राम मंदिर परिसरात ही घटना घडली. देवस्थान आवारात सुरक्षा रक्षकांकडून भाविकांना धक्काबुक्की होत असल्याचे पाहून फिर्यादी माया लंघे यांनी याबाबत विचारणा केली. याचा राग आल्याने सुरक्षा रक्षकांनी माया लंघे, त्यांचे पती हंबीर लंघे आणि मुलगा राजवर्धन यांना हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

तसेच शिवीगाळ करून फिर्यादींचा मोबाईल फोन जमिनीवर आपटून फोडण्यात आला, असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणातील आरोपींमध्ये निळा शर्ट व काळे जॅकेट परिधान केलेली, कानात बाळी घातलेली एक व्यक्ती, तसेच चार पुरुष सुरक्षा रक्षक आणि तीन महिला सुरक्षा रक्षक यांचा समावेश आहे. मात्र, आरोपींची संपूर्ण नावे व इतर तपशील अद्याप स्पष्ट झालेले नाहीत. घटनेच्या वेळी देवस्थान परिसरात मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होती. खेड पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून, संबंधित आरोपींचा शोध सुरू आहे. लवकरच आरोपींना अटक करण्यात येईल, असे खेड पोलिसांनी सांगितले आहे.

# मंचरच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध; नगराध्यक्षा राजश्री गांजाळे यांची ग्वाही

**मंचर । प्रतिनिधी**

मंचर शहराच्या विकासाकरिता आम्ही नगरसेवक कटिबद्ध राहू.शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील.अशी ग्वाही नगराध्यक्षा राजश्री गांजाळे यांनी दिली.मंचर (ता.आंबेगाव) येथील धर्मवीर संभाजी नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सन २०२६ ची दिनदर्शिका प्रकाशन व मंचर नगरपंचायत नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार सोहळा संस्थेचे अध्यक्ष सीताराम लोंढे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

कार्यक्रमप्रसंगी नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्षा राजश्री गांजाळे, नगरसेवक वंदना बाणखेले,उर्मिला प्रवीण मोरडे, वसंतराव बाणखेले,विकास



जाधव, डॉ.सोनाली विकास बाणखेले, धनेश मोरडे, अंजली बाणखेले, संदीप थोरात, रविकिरण आवळे, शिवाजी राजगुरू, इम्रानअली मीर, अंशरा शेख, मालती थोरात,माणिक गावडे, पल्लवी गांजाळे, बेबी थोरात इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या सर्वांच्या उपस्थित त्यांच्या हस्ते दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.प्रास्ताविकात संस्थेचे उपाध्यक्ष मंगेश बाणखेले यांनी संस्थेच्या ठेवी ७५ कोटी रुपये, तसेच पतसंस्थेच्या प्रगतीची माहिती दिली. कार्यक्रमास संचालक पुरुषोत्तम पोकार, सुदाम बेंडे, दिलीप महाजन, शांताराम बाणखेले, मनीष ठक्कर, बाबाजी इंदोरे, पप्पुशेठ थोरात, अश्विनी शेटे, अनिता निघोट, अजेस भोंडवे व जितेंद्र सोनवणे व संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शेवाळे आदी मान्यवर उपस्थित होते.आभार अश्विनी शेटे यांनी मानले.

# हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील प्राध्यापक बेपत्ता; दुसऱ्या दिवशी धक्कादायक उलगडा

**राजगुरुनगर । प्रतिनिधी**

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागात सायन्स (जीवशास्त्र) विषयाचे प्राध्यापक डॉ. भानुदास मोतीलाल परदेशी (वय ५२) यांचे निधन झाल्याचा दुर्दैवी प्रकार समोर आला आहे.खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात गेली २३ वर्षे अध्यापन करणारे प्रा. डॉ. परदेशी हे शांत, संयमी, सुस्वभावी व विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून परिचित होते.


मात्र गुरुवारी (दि. २५) खेड तालुक्याच्या पश्चिम भागातील शिरगाव-तळेघर रस्त्यावरील मंदोशी गावाजवळ, भैरवनाथ मंदिर परिसरातील एका विहिरीत त्यांचा मृतदेह आढळून आल्याने सर्वांनाच धक्का बसला. मिळालेल्या माहितीनुसार, प्रा. परदेशी हे बुधवारी (दि. २४) दुपारी सुमारे ३ वाजता महाविद्यालयातील अध्यापनाचे काम आटोपून मोशी येथे जाण्यासाठी मोटारसायकलवरून निघाले होते. मात्र ते घरी न पोहोचल्याने सायंकाळी सुमारे ८ वाजता त्यांच्या पत्नीने सहकारी शिक्षकांकडे चौकशी केली. त्यानंतर शिक्षकांनी एकत्र येऊन शोधमोहीम सुरू केली. वाकी येथील एका हॉटेलमध्ये चहा घेतानाचे सीसीटीव्ही फुटेज आढळून आले. मोबाईल बंद असल्याने अपघाताची शक्यता लक्षात घेऊन विविध रुग्णालयांत चौकशी करण्यात आली. अखेर रात्री १. ३० वाजता खेड पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार दाखल करण्यात आली. दरम्यान, मंदोशी येथील भैरवनाथ मंदिर परिसरात सायंकाळी मोटारसायकल, बॅग व चपला आढळून आल्याने पुजाऱ्यांनी पोलिस पाटील व ग्रामस्थांना माहिती दिली. मोटारसायकल क्रमांकाच्या आधारे चाकण पोलिसांनी खेड पोलिसांशी संपर्क साधला. माहिती जुळल्यानंतर कुटुंबीय व सहकारी शिक्षकांना कळविण्यात आले. स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने विहिरीत शोध घेतल्यानंतर रात्री सुमारे १२ वाजता मृतदेह हाती लागला. त्यानंतर शुक्रवारी सकाळी चांडोली ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले.

# भीमाशंकर मंदिर ३ महिन्यांसाठी बंद

**पुणे । प्रतिनिधी**

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले भीमाशंकर मंदिर काही दिवसांसाठी बंद राहणार आहे. भीमाशंकर मंदिरातील सभामंडप व पायरी मार्गाच्या बांधकाम तसेच भाविकांची सुरक्षितता अबाधित राखण्यासोबतच कामे नियोजनबद्ध व कालमर्यादेत पूर्ण करण्याच्यादृष्टीने मंदिर ९ जानेवारी २०२६ पासून पुढील ३ महिन्यांसाठी महाशिवरात्रीचा कालावधी वगळून भाविकांना दर्शनाकरिता बंद करण्यात येणार आहे. श्री क्षेत्र भिमाशंकर संस्थानने हा निर्णय घेतला आहे. याकरिता भाविकांना सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी केले आहे. मात्र भाविकांच्या सोयी करिता महाशिवरात्रीच्या कालावधीमध्ये मंदीर भाविकांकरिता दर्शनाकरिता खुले राहणार आहे.

राज्य शासनाने १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष विकास आराखड्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. २३ डिसेंबर रोजी जिल्हा प्रशासन, श्री क्षेत्र भीमाशंकर देवस्थान संस्थानचे विश्वस्त, स्थानिक दुकानदार व भीमाशंकर ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत संयुक्त बैठकीत सर्वाच्या सहमतीने मंदिर ९



जानेवारीपासून पुढे तीन महिन्यासाठी (महाशिवरात्रीचा १२ ते १८ फेब्रुवारी २०२६ हा कालावधी वगळून) तात्पुरते बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. २०२७ मध्ये त्र्यंबकेश्वर, नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन होणार आहे. त्यापूर्वी प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभ २०२५ च्या अनुभवावरून कुंभमेळ्याच्या काळात नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे येणाऱ्या लाखो भाविकांकडून श्री क्षेत्र भीमाशंकर येथे दर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर कुंभमेळ्यापूर्वी आवश्यक पायाभूत सुविधा, सभामंडप, सुरक्षित प्रवेश-निर्गमन व्यवस्था तसेच गर्दी नियंत्रणाची कामे वेळेत पूर्ण करणे हे प्रशासनाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. कामाचे स्वरूप व व्याप्ती लक्षात घेता भाविकांची सुरक्षितता अबाधित राखण्यासोबतच कामे नियोजनबद्ध व कालमर्यादेत पूर्ण करणे आवश्यक असल्याने मंदिर परिसर भाविकांसाठी तात्पुरता बंद करण्यात येणार आहे. मंदिर दर्शनासाठी बंद असले तरी श्री भीमाशंकर यांची नित्य पूजाअर्चा, अभिषेक व धार्मिक विधी परंपरेनुसार व नियोजित वेळेत सुरू राहतील. थेट दर्शन बंद या कालावधीत भाविकांना मंदिर परिसरात प्रवेश अथवा प्रत्यक्ष दर्शन सेवा उपलब्ध राहणार नाही. बांधकाम यंत्रणा, अधिकृत अधिकारी कर्मचारी तसेच भीमाशंकर ग्रामस्थ वगळता कोणालाही श्री क्षेत्र भीमाशंकर परिसरात प्रवेश दिला जाणार नाही.

# पोलीस भरतीसाठी निघालेल्या मित्रांवर काळाचा घाला; अज्ञात वाहनाच्या धडकेत एक ठार

**शिक्रापूर । प्रतिनिधी**

पोलीस भरती प्रक्रियेसाठी दुचाकीवरून जात असलेल्या दोन मित्रांना पाठीमागून आलेल्या अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात एक युवक ठार, तर एक युवक गंभीर जखमी झाला. हा अपघात कोरेगाव भीमा (ता. शिरूर) येथील पुणे-नगर महामार्गावरील वाडागाव फाटा परिसरात घडला. याप्रकरणी शिक्रापूर पोलीस ठाण्यात अज्ञात वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मृत युवकाचे नाव उबेद सलीम शेख (वय २२, रा. नागापूर एमआयडीसी, अहिल्यानगर) असे असून, गंभीर जखमी युवकाचे नाव शिवसागर अरुण आदिक (वय २१, रा. खानापूर, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, उबेद शेख व शिवसागर आदिक हे दोघे मित्र दुचाकीवरून (एमएच १५ ईएल ८६८८) पोलीस भरती प्रक्रियेसाठी जात असताना, पाठीमागून भरधाव वेगाने आलेल्या अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली.

या अपघातात दोघेही गंभीर जखमी झाले. त्यामध्ये उबेद शेख यांचा जागीच मृत्यू झाला, तर शिवसागर आदिक यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघातानंतर संबंधित अज्ञात वाहन चालक वाहनासह घटनास्थळावरून फरार झाला. याबाबत सलीम दस्तगीर शेख (वय ५१, रा. संगमनेर रोड, श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर) यांनी शिक्रापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.